म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

पं. सं. ९३६

सत्कार्योत्तेजक सभा, धुळें.

# छत्रपती श्री शिवाजी महाराज
व
# शिवजन्मोत्सव.

शिवराजास आठवावें ।
जीवित्व तृणवत् मानावें ॥
इहपरलोकीं तरावें ।
कीर्तिरूपें ॥
शिवराजाचें आठवावें रूप ।
शिवराजाचें आठवावा प्रताप ॥
शिवराजाचा आठवावा साक्षेप ।
भूमंडळीं ॥

रामदास.

चित्रशाळा छापखान्यांत छापिलें.

चैत्र शुद्ध १ शके १८२१.

( पुस्तकासंबंधीं सर्व हक्क सभेनें आपल्याकडे राखून ठेविले आहेत )

किंमत सहा आणे.

# शिवजन्मोत्सव.

—०:*:०—

ज्या नरवीरानें महाराष्ट्रास यवनाच्या त्रासातून मुक्त करून कांहीं काळ त्यास स्वातंत्र्यसुखाचा लाभ करून दिला, त्याची आठवण महाराष्ट्रीयाना सदैव राहणें किती अगत्याचें आहे हें जाणून पुण्याच्या व इतर ठिकाणच्या कित्येक महाराष्ट्राभिमानी मंडळींनीं श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीस, म्हणजे वैशाख शुद्ध द्वितीयेस, रायगडास व पुण्यास उत्सव करण्याचा प्रघात शके १८१६ सालीं घातला; व त्याच्या पुढल्या वर्षापासून अशा प्रकारचा उत्सव महाराष्ट्रात, किंबहुना जेथें जेथें महाराष्ट्रीय वास करितात अशा लहान मोठ्या पुष्कळ ठिकाणीं, होऊं लागला. आपल्या प्रतापी पूर्वजांनीं जी कीर्ति मिळविली ती आपणास वाढवितां जरी येत नसली तरी तिचें चिरकाल स्मरण ठेवून त्याच्या ऋणातून अशत. मुक्त होण्याचा प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे. अशा प्रकारचें स्मरण ठेवण्यास अशिक्षित मनुष्यास साधन नसतें; तसें साधन ह्या उत्सवानें व त्या वेळीं जीं ऐतिहासिक व्याख्यानें होतात त्यांनीं करून दिल्यासारखें होतें. हा ह्या उत्सवापासून **पहिला फायदा** आहे. अशा प्रकारच्या धार्मिक व ऐतिहासिक उत्सवापासून **दुसरा फायदा** असा होतो कीं,

अप्रबुद्ध जनास त्या प्रसंगीं नीतिमत्तेचें व आपल्या सद्य:स्थितीचें शिक्षण मिळतें. महाराजाच्या नीतिमान चरित्रांत उदात्त मनोविकाराची परीक्षा होण्यासारखे जे कित्येक प्रसंग आले आहेत ते वाचून व ऐकून कोणाचें अंत:करण क्षणभर प्रेमळ विचारानीं भरून येणार नाहीं? “आपण होतों कसे, झालों आहोंत कसे” ह्याचें ज्ञानच जर नाहीं, तर आपली सद्य स्थिती कशी आहे हें तरी कोठून कळणार व ती सुधारण्याचा प्रयत्न तरी कसा होणार? जगाच्या आरंभापासून आपली अशीच स्थीति आहे व ती तशीच प्रळयकाळपर्यंत चालणार अशी ज्याची समजूत त्याच्या हातून आत्मोन्नतीचा प्रयत्न कसा व्हावा? अशा प्रकारच्या धार्मिक–ऐतिहासिक उत्सवापासून **तिसरा** मोठा **फायदा** असा आहे कीं त्या योगें ‘स्वाभिमान’ जागृत रहातो. एका प्रख्यात इंग्रज तत्ववेत्त्यानें असें म्हटलें आहे कीं लोकाचें अतिशय नुकसान करावयाचें असें जर एखाद्या सरकारच्या मनात आलें तर त्यानें प्रजेच्या अंत:करणातील स्वाभिमानाची कल्पना नष्ट करून अपमानास्पद स्थितींत समाधान मानण्यास प्रजेस शिकवावें.* आमच्या दयाळू

* Self-respect is the very essence of national life. A great nation may suffer great disasters and survive them, if the spirit of its people remains intact. × × × × But if a nation loses its vigour

( पुढें चालू. )

सरकारचा अशा प्रकारचा दुष्ट हेतु नाहीं हें उघड आहे, नाहीं पेक्षां आमच्या पूर्वजाचे अभिमानोत्तेजक इतिहास त्यांनीं लिहून ठेवून ते आह्मास शिकविले नसते. सदरहु उत्सव आपल्या सरकारास आवडणार नाहीं अशी जी कित्येक लोकांची भ्रामक समजूत आहे त्यास वरील उत्तर बस आहे. प्रजेनें शिवजन्मोत्सव करावा हें सरकारास आवडत नाहीं असें म्हणणे म्हणजे प्रजेचा स्वाभिमान नष्ट करून त्याना अवनतीस पोचविण्याची सरकारची इच्छा आहे असें म्हणण्या सारखें होणार आहे. ग्रांट डफ सारख्या हिंदु लोकाच्या पक्षपाती उदार साहेबांनीं आमचा इतिहास लिहिला नसता तर आज आह्मास स्वत:विषयींचें ज्ञान होण्यास फारसें साधन उरलें नसतें. आमच्या पूर्वजाची माहिती एकत्र करून तिचा संग्रह ज्या इंग्रज ग्रन्थकारांनीं केला व ज्या सरकारानें इतिहासाचें ज्ञान म्हणून ती माहिती आम्हास करून

---

( मागील पृष्ठावरून. )

and self respect, if it begins to groan under the burdens of extended empire and to prefer comfort to honour, ignoble ease to noble effort, the hour of its decline has sounded. ×××× *The most fatal thing any Government can do for a country is to destroy its sense of self-respect and teach it to acquiesce in what is felt to be dishonourable.*

*Modern Science and Modern Thought P. 304 by S. Laing.*

देण्याची लहानमोठ्या शाळांतून व्यवस्था केली, तें सरकार आज उत्सवाचे विरुद्ध आहे असें म्हणणें म्हणजे आमच्या उदार सरकारच्या माथीं अनुदारता लादण्यासारखें आहे.

ज्या राष्ट्राला पूर्व नाहीं त्यास उत्तरही नाहीं अशा अर्थाचें इंग्रजींत एक वचन आहे. त्याचा अर्थ इतकाच कीं, गिरविण्यास पुढें एखादा चांगला कित्ता नसला म्हणजे अक्षर वळणदार येण्याचा जसा संभव नसतो तद्वत् अनुकरणीय अशा धर्मशील, प्रतापी, व कारस्थानी पूर्वजांचीं चरित्रें लोकांना अवगत नसलीं, तर त्यांचीं मनें शून्य असतात, त्यांना उत्साह नसतो, व आपणांस पूर्वजांहून वरचढ करता येत नसली तरी त्यांच्या इतकी कीर्ति मिळविली पाहिजे अशी त्यांना महत्वाकांक्षा नसते. तेव्हां इतिहासाच्या ज्ञानापासून व ऐतिहासिक उत्सवापासून **चवथा लाभ** असा आहे कीं, त्या योगें अनुकरणीय अशीं चित्रें मनुष्याच्या डोळ्यापुढें नेहमीं राहतात. सुदैवानें आमच्या अगदीं नुकतेच होऊन गेलेल्या पूर्वजांचे वृत्तांत आपणांस वाचावयास आहेत व ज्या राष्ट्राला पूर्व आहे त्याला उत्तरही आहे हें जर खरें असेल, तर इंग्रज सरकारच्या साहाय्यानें आर्यावर्तास पुनरपि सुदीन प्राप्त होतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं. आता एवढें खरें आहे कीं, प्राचीन इतिहास असूनही तो लोकांच्या डोळ्यापुढून जाण्याचा संभव आहे.

प्राचीन इतिहास नसणें व तो असून त्याचें ज्ञान नसणे या दोन्ही अवस्थांचा परिणाम सारखाच झाला पाहिजे. असें होऊं नये, पूर्वजांची माहिती लोकांना व्हावी, म्हणून अशा प्रकारच्या उत्सवाची फार अवश्यकता आहे.

अशा प्रकारें सदरहु उत्सवाची योग्यता असतां अनेक लोकांकडून उत्सवाविरुद्ध कित्येक आक्षेप आणण्यांत येतात. एखाद्या सार्वजनिक संस्थेस अगर कार्यास मदत करण्याच्या आड आपला व्यक्तिद्वेष, भित्रेपणा, अथवा सार्वजनिक कृत्यांत द्रव्यव्यय करण्याची आपली अनुदारता येत असली, तर तसें कबूल न करितां त्या संस्थेस अगर कार्यासच नांवें ठेवून आपली मत्सरबुद्धि, भेकडपणा, व कंजुषवृत्ति झाकण्याचा कित्येक लोक प्रयत्न करितात. सार्वजनिक कामीं मदत मागण्यासाठीं लोकांजवळ हात पसरण्याचे ज्यांच्यावर प्रसंग आले असतील त्यांना वरील म्हणण्याची सत्यता तेव्हांच पटेल. "तुह्मी म्हणतां खरें पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं, कांहीं फायदा होईल असें मला वाटत नाहीं, नाहींपेक्षा आपण मदत केली असती" असा तत्वज्ञानाचा आव घालून जे केवळ आपल्या हातचा पैसा जाऊं नये, अथवा आपल्या हातून सत्कार्य घडत नाहीं तेव्हां ते दुसऱ्याच्या हातूनही घडूं नये, एखाद्या भानगडींत पडून आपल्या मनाच्या स्वास्थ्यास व्यत्यय येऊं नये, म्हणून स्वस्थ न बसतां उलट एखाद्यानें

आरंभिलेलें कार्यच वाईट आहे असें प्रतिपादन करितात, अशाच्या आक्षेपांत यथार्थता कितपत असणार, हें सांगाव-यास नकोच, तरी अप्रबुद्ध जनांस फसवून त्यांचे भलतेंच ग्रह बनविण्यास असे आक्षेप कारण होतात म्हणून थोडक्यात त्या आक्षेपांचा विचार करणें आवश्यक आहे.

अशा लोकांकडून व इतराकडून जे अक्षेप येतात त्यात प्रमुख असे चार पाच आहेत:—

( १ ) शिवजन्मोत्सव पूर्वीपासून होत नव्हता, तो नवीन आहे. आर्यांचे उत्सव काय थोडे आहेत, तर आ-पणास नवीन करावयास लागावें ?

( २ ) शिवजन्मोत्सवापासून काहीं फायदा होईल असें वाटत नाहीं.

( ३ ) आपण शिवजन्मोत्सव करणें सरकारास आ-वडणार नाहीं.

( ४ ) शिवजन्मोत्सवापासून आपल्या मुसलमान बांधवास चीड येईल.

( ५ ) श्रीशिवाजी महाराजाच्या अंगीं असा काय मोठेपणा होता कीं लोकांनीं त्याचा उत्सव करावा ! ग्रीस देशाचा शिकंदरही त्याच्याच तोडीचा होता, मग आपण शिकंदराचा अथवा दुसऱ्या एखाद्या त्याच प्रतीच्या नरवीराचा उत्सव का न करावा ? शिवाय श्री. शिवाजी महाराजास ज्यांच्यापासून स्फूर्ती मिळाली त्या रामदास

स्वामींचा आपण उत्सव करावयाचें सोडून त्यांचे भेस्याचा कारितो हे अयोग्य होणार नाहीं काय ?

आता पहिल्या आक्षेपासंबधानें असें म्हणतां येईल कीं एखादी गोष्ट केवळ नवीन आहे म्हणून जर वर्ज करावयाची तर इंग्रजी शिक्षणाबरोबर ज्या सर्व नवीन गोष्टी आमच्या आक्षेपकानीं उचलल्या आहेत त्या त्याना सोडाव्या लागतील. ही गोष्ट सदरहु आक्षेप आणतांना त्याच्या लक्षात नसावी असें वाटतें. हल्लीं ज्या संस्था आहेत त्या हीं एकवार नवीन होत्या. जगांत अशी कोणती गोष्ट आहे कीं जी एकदां नवीन नव्हती? कोणत्याही गोष्टीची युक्तायुक्तता ठरवावयाची तर ती जुनी कां नवी आहे ह्यावरून ठरवावयाची नाहीं; तर तिची उपयुक्तता पाहिली पाहिजे. स्थित्यतरामुळें अनेक गोष्टींचा अगीकार करावा लागतो. स्वाभिमान उत्पन्न होण्यास पूर्वकाळीं शिवजन्मोत्सवाची अवश्यकता वाटली नव्हती, पण आजच्या पालटलेल्या स्थितींत जर तो उत्सव जरूर असेल तर तो प्रघात केवळ नवीन होईल म्हणून न स्वीकारणें अयोग्य होय. नवीन चालीरीतींचें मण्डन कारिताना "पुराणमित्येव न साधु सर्वम्। न चापि॰ काव्यं नवमित्यवंद्यम् ।" अशी कोटी जे लोक लढवितात तेच हा आक्षेप आणतात, हें मोठें नवल आहे. आधींच उत्सव काय थोडे, तर हा आणखी नवीन पाहिजे, या म्हणण्यात थोडी चूक आहे. रामजयंती वगैरे जे आ-

पणात उत्सव आहेत ते आज सर्वस्वी धार्मिक होऊन बसले आहेत. धार्मिक-ऐतिहासिक असा उत्सव आपणात दुसरा मुळींच नाहीं ह्मणून शिवजन्मोत्सवांची अवश्यकता आहे. आतां हा ही उत्सव इतर उत्सवाच्या वळणावर जाऊन केवळ धार्मिक बनणार नाहीं म्हणून कशावरून, असा कोणी आक्षेप आणील; पण त्या संबंधानें असें म्हणता येईल कीं त्यास इतर उत्सवाच्या वळणावर जाऊ न देण्याची जबाबदारी सर्वांवर आहे. आक्षेप काढून तटस्थ राहिल्यानें आपली जबाबदारी संपते असें कोणी समजू नये. शिवजन्मोत्सव करणें ज्यास मान्य आहे, पण त्यास भलतेंच स्वरूप प्राप्त होईल अशी ज्यास भीति वाटत आहे, त्यांनीं उत्सवांत सामील होऊन इच्छेनुरूप उत्सवास स्वरूप देण्याचा यत्न करावा. न करत्याचा वार शनिवार ह्या व्यावहारिक म्हणीप्रमाणें नुसते आक्षेप काढून अलिप्त राहणें कोणासही शोभणार नाहीं.

उत्सवापासून काहीं फायदा आहे असें कित्येकास वाटत नाहीं. ह्या आक्षेपांत फायदा म्हणजे काय ह्याचा बोध होत नाहीं. हजाराचे दोन हजार झाले म्हणजे फायदा, पण पूर्वजांविषयीं यथार्थ ज्ञान होऊन आपल्या कर्तव्याचा बोध होण्यास जो उत्सव कारण होणार त्यापासून काहीं फायदा नाहीं, असें तर समजावयाचें नाहींना ? पैशाच्या रूपानें फायदा मोजण्याच्या व्यापारी दृष्टीनें असल्या उत्सवाकडे पाहून कसें चालेल ? व्यापारांत

एका पैशाचे दोन पैसे कदाचित् लवकर होत असतील, पण कोणत्याही धार्मिक ऐतिहासिक उत्सवाचा लोकांच्या मनावर परिणाम होऊन त्यांनीं योग्य मार्गाला लागण्यास कालावधी लागाच पाहिजे, हें विसरता कामा नये. महाराजांचा उत्सव सुरू झाल्यापासून निदान महाराष्ट्रांतील लोकांचें लक्ष आपल्या पूर्वजांचा वृत्तांत जाणण्याकडे विशेष लागलें, हा दोन तीन वर्षांच्या उत्सवापासून लहान फायदा झाला असें म्हणता येणार नाहीं. ह्या लेखाच्या आरंभीं उत्सवाची अवश्यकता दाखवितांना त्यापासून होणाऱ्या फायद्याचें दिग्दर्शन केलेंच आहे. मानसिक उन्नतीची पर्वा न करिता केवळ पैशावर नजर ठेवणारास मात्र ह्या उत्सवापासून काहीं प्राप्ति नाहीं.

स्वतःला जी गोष्ट करवत नाहीं, ती दुसऱ्यानें ही न करावी, अशी सदिच्छा बाळगणाराकडून लोकांना भीति वाटावी ह्मणून वर नमूद केलेला तिसरा आक्षेप आणण्यांत येतो. ह्या आक्षेपाचें निरसन वर थोडक्यांत केलेंच आहे. सरकारास शिवजन्मोत्सव आवडणार नाहीं हा अक्षेप निराधार आहे, इतकेंच नव्हें, तर वस्तुस्थिति त्याच्या उलट आहे. इतर बाबतींत आमचें सरकार कसेंही असलें तरी आह्मास आमच्या पूर्वजांची माहिती व्हावी अशी त्याची पूर्ण इच्छा दिसते. नाहीं पेक्षां त्या माहितीचा लाभ लोकास करून देण्याची त्यांनीं व्यवस्था केली नसती. उलट श्री शिवाजी महाराजाबद्दल जी आस्था

वाळगावयास पाहिजे ती आम्ही बाळगीत नाहीं ह्मणून पुष्कळ इंग्रज ग्रंथकार्यांनीं खेद व आश्चर्य हीं प्रगट केलीं आहेत. डग्लस साहेबानीं ' मुंबई व पाश्चात्य हिंदुस्थान ' या नांवाचा लार्ड रे साहेबाच्या सुचनेवरून एक ग्रन्थ लिहिला आहे. त्यांत ते एके ठिकाणीं लिहितात:— ' शिवाजी बद्दल हल्लीं कोणास पर्वा वाटत नाहीं. रक्तपात व संपत्ति याच्या योगानें मिळविलेल्या ज्या विस्तीर्ण मुलुखावर त्यानें एकवार राज्य केलें, व जो मुलुख त्यानें काळजीपूर्वक कोल्हापूरचे राजे, साताऱ्चे भोसले, व त्यांचे पुण्याचे पेशवे, याच्या स्वाधीन केला, त्या सर्व मुलूख भर आज एकही मनुष्य मराठी साम्राज्यसंस्थापकाच्या समाधीच्या दुरस्तीकरिता अगर ती कायम राखण्याकरितां एक रुपया सुद्धां देत नाहीं. '* अशा प्रकारें महाराजा-बद्दल महाराष्ट्रीयांची अनास्था पाहून आश्चर्यानें डग्लस साहेबानीं वरील उद्गार काढले आहेत, व त्या खालीं टिपेंत ते लिहितात.— " ट्यूडर व स्टुअर्ट या दोन घराण्यां-

---

* No man now cares for Shivajee over all those wide domains, which once owned him lord and master, acquired by so much blood and treasure and which he handed with care to the Rajas of Kolhapur the Bhosles of Satara and their Peshwas in Poona. Not one man now contributes a rupee to keep or repair the tomb of the founder of the Maratha Empire.

चा शिल्पकलेच्या रूपानें राहिलेला अवशेष भाग विलायत सरकार जतन करितें. शिवाजीच्या समाधीची, देवाळयाची, व छत्रीची तशीच व्यवस्था मुंबई सरकारास करिता यावया-नाहीं काय? प्राचीन कालाचें ज्ञान करून देणाऱ्या खात्यातून पैशाचा विनियोग होत असतां जो चूरा पडतो त्यापैकीं थोडासा चुरा, एका आवेशयुक्त व अद्भुत काळचीं स्मारकें जतन करण्यास बस होईल! सन १८८९ सालीं लार्डरे साहेब गव्हर्नर होऊन इकडे आ-ल्यावर लवकरच रायगडावरील शिवाजीची समाध दुरुस्त करण्या विषयीं त्यानीं हुकूम दिला व त्या प्रमाणें ती दुरुस्त झाली. "*

ज्यानें एकवार आम्हांस " मराठे " असें म्हणण्याचा योग आणून दिला होता त्या थोर पुरुषाविषयीं आमची हल्लींची गर्हणीय उदासीन वृत्ति पाहून डघल्स साहेबानें

---

* The British Government conserves the architectural remains of Tudor and Stuart Will not the Bombay Government do as much for the tomb, the temple of the arch of Sivaji? A few crumbs that fall from the archaeological bureau would suffice to keep in repair memorials of a dashing and most romatic period. Lord Reay shortly after he came out as Governor in 1995 gave instrnctions to have Sivaji's tomb on Raygarh repaired, which was done.

Donghlas on *Bombay and Western India Vol. II P. 130.*

आमची एक प्रकारें ह्या दोन वृत्तान्तांतील केलेली कानउघाडणी, मुंबईचे माजी गव्हर्नर यांस समाधीच्या डागडुजीबद्दल केलेली सूचना, व इलाखाधिपतीकडून त्या सूचनेची झालेली अम्मलबजावणी, हीं वाचून, "महाराजाबद्दल आम्हीं आस्थापूर्वक उत्सव करणें आमच्या सत्यप्रिय सरकारास आवडणार नाहीं" असा आक्षेप अद्याप ज्याच्या डोक्यांतून सोडणार नाहीं त्या महापुरुषाचें डोकें काहीं विचित्र असलें पाहिजे, दुसरें काय ?

शिवजन्मोत्सवावर चवथा आक्षेप असा आहे कीं त्यापासून आपल्या मुसलमान बांधवास चीड येईल. हा आक्षेप खोडसाळ आहे. आज दोन चार वर्षे महाराष्ट्रांत लहान मोठ्या पुष्कळ ठिकाणीं उत्सव होत आला आहे पण त्यापासून आपले मुसलमान बांधव चिडले असें कोठेंही घडल्याचें ऐकिवात नाहीं. हा आक्षेप काढणें म्हणजे आपल्या बांधवांस योग्यायोग्य कळत नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. शिवाय आज महाराजाचा जो उत्सव होत आहे तो त्यानीं यवनास पादाक्रान्त केलें म्हणून नव्हे, तर त्या नरवीराच्या अंगीं असे अनेक अलौकिक गुण होते कीं ज्यांचें अनुकरण करणें कोणासही श्रेयस्कर होईल, म्हणून त्यांचा उत्सव करण्यांत येत आहे. ही गोष्ट आमच्या बांधवांना माहीत आहे. उत्सवापासून मुसलमान बांधवांस चीड येत नाहीं इतकेंच नव्हे तर उत्सवाची उपयुक्तता त्यांच्या लक्ष्यांत येऊन समाधीच्या

दुरस्तीकरिता कित्येक उदार मुसलमान बांधवानीं वर्गणी दिली आहे. तसेंच उत्सवातही त्यांचें अंग असतें ही गोष्ट ज्यानीं गेल्या वर्षी धुळ्याच्या उत्सवात हिंदु मुसलमानाचें परस्पराशीं सलोख्याचें वर्तन पाहिलें असेल त्यास सहज कळणार आहे.

यांच्या आक्षेपानें तर मुळावरच कुठार प्रहार केला आहे. श्री. शिवाजी महाराजाची अशी काय योग्यता होती कीं त्याचा आम्ही उत्सव करावा याचें उत्तर महाराजाचे चरित्रावरून मिळणारें आहे. स्वदेशासाठीं व स्वधर्मासाठीं अश्रान्त परिश्रम करून ज्यानें कांहीं काल महाराष्ट्र हें नाव गाजविलें, त्यानें काय केलें, असें विचारणे हा कृतघ्नपणा होय. महाराजानीं आमच्याकरिता निरपेक्षपणें यत्न करून मिळविलेलें वैभव आज आम्हास सांभाळितां आलें नाहीं, म्हणून त्याची योग्यता कमी होते असें नाहीं. आक्षेपाच्या उत्तरार्धावरून आक्षेपक वसुधाकुटुंबी असावेत असें वाटतें. आपपरभाव नष्ट होऊन त्यांची दृष्टि प्रगल्भ झाली असावी असें दिसतें. शिवाजी काय व शिकंदर काय सारखेच ! सर्व प्राणिमात्रांच्या ठायीं आक्षेपकांची समानबुद्धि आहे असें क्षणभर वादासाठीं कबूल केलें, तरी शिवाजी महाराजाच्या तोडीचे म्हणून पुढें आणिलेले नरवीर महाराजांच्या पायरीपर्यंत येतात काय ? शिवाजी महाराजांची योग्यता इतर राष्ट्रांतील त्यांच्या तोडीच्या पुरुषापेक्षां कशी अधिक आहे हें पुढील चरि-

त्रावरून वाचकांस कळून येणार आहे; परंतु आधीं आ-
मच्या आक्षेपकाची इतकी समदृष्टि झाली आहे कोठें ?
कारण तसें म्हणावें तर घरदारें, बायका पोरें, पैसा या-
वरील आक्षेपकांचें प्रेम उडालेलें दिसत नाहीं. शिवाजी
महाराज व शिकंदरादि परराष्ट्रीय पराक्रमी राजे यांत
फरक न दिसण्याचें कारण त्यांचें इतिहासाचें अज्ञान
होय. स्वदेशाच्या इतिहासाच्या वाचनानें जी आत्मप्रीति
व जो स्वाभिमान उत्पन्न होतो त्या मनोवृत्तींची ह्यांना
ओळखही नसते. इतिहासाच्या अभावीं लोकांचीं मनें
नीचतर अवस्थेला जाऊन पोंचतात ह्याचा दृष्टान्त सद-
रहू आक्षेपावरून मिळण्यासारखा आहे.

सारांश पांचव्याही आक्षेपात काहीं तथ्य नाहीं. इ-
तिहासाच्या अज्ञानामुळें जी अभिमानशून्यता उत्पन्न
होते तीपासून ह्या आक्षेपाचा उद्भव आहे. आतां श्री
समर्थांचा उत्सव करण्याचें टाकून त्याच्या चेल्याचा क-
रणें योग्य नव्हे ह्या ह्मणण्याचा अर्थ इतकाच कीं आक्षे-
पकाना कांहींच करावयाचें नसतें तेव्हां कोणी काहींही
कार्य आरंभिल्यास त्यावर ह्यांची शंका असणारच. उद्यां
श्री समर्थांचा उत्सव सुरू झाल्यास ( श्री समर्थांनीं
स्थापिलेल्या सांप्रदायांच्या मठांत हा उत्सव होतच
असतो. ) हेच आक्षेपक ह्मणूं लागतील कीं,
" कायहो शिवाजी सारखा शिष्य न मिळता तर
एकटे रामदास स्वामी काय करणार होते !

पंचवीस वर्षें कल्याणासारखे चेले जवळ असतां त्यांच्या हातून काय झालें तर ह्या कामीं गुरूपेक्षां शिष्याचें महत्त्व जास्त आहे. तेव्हां शिष्याचा उत्सव न करितां गुरूजींचा करणें अयोग्य आहे." यावरून ह्याही ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल.

अखेरीस लेखकाची जगन्नियन्त्याजवळ प्रार्थना इतकीच आहे कीं 'आपण कोण' ह्याची उत्कृष्ठ साक्ष पटवून देणाऱ्या शिवजन्मोत्सवासंबंधानें लोकांचे व सरकारचे भलभलते ग्रह पालटून सर्व लोक—लहान मोठे, गरिब श्रीमंत, सुधारक उद्धारक,—एक दिलानें उत्सव करूं लागोत, आमचें प्रेम आमच्या पराक्रमी व वैभवशाली पूर्वजावर दृढ होवो, त्यांच्या आशीर्वादास आह्मीं पात्र होऊन देशाच्या आमच्या व त्यांच्याच कृपाप्रसादानें आह्मामध्यें महाराजासारखे नीतिमान, स्वधर्मरत पुरुष निपजून, आमच्या राजकर्त्यांचा व त्याबरोबर आमचा लौकीक सर्वत्र होऊन महाराष्ट्र सुखी होवो.

# श्री शिवछत्रपती.

ज्या थोर पुरुषाच्या जन्मवृत्तापैकीं कांहीं भाग पुढें देण्याचें आम्हीं योजिलें आहे त्याच्या चिमुकल्या प्रांताची पूर्वीची हकीकत थोडक्यांत सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं, असें समजून पहिल्या प्रथम आपण तिकडेच वळू.

# महाराष्ट्र.

श्री शिवछत्रपति ज्या प्रांतीं अवतीर्ण झाले तो देश महाराष्ट्र होय उत्तरेस सातपुड्यापासून दक्षिणेस कृष्णा नदीपर्यंत आणि पश्चिमेस सह्याद्रि पर्वतापासून पूर्वेस वाईन गंगेपर्यंत जो मुलूख त्यास महाराष्ट्र असें म्हणतात. रामावतारीं दंडकारण्य म्हणून जो भाग गणिला जात असे तोच हल्लींचा महाराष्ट्र होय महारठ म्हणून एक प्रकारचे लोक ह्या देशात होऊन गेले त्यावरूनच पुढें महाराष्ट्र असें नाव ह्या देशास मिळालें असावें. ह्या रठ लोकांचें मूळ वसतिस्थान* हल्लीं धुळें शहर ज्या ठिकाणीं आहे त्याच्या आसपासच असावें. तथापि या उपपत्तीवर आतां बऱ्याच लोकाचा भरंवसा नाहीं. या देशांतील पूर्वीचे राजे हिंदुस्थानच्या बऱ्याच मोठ्या भागावर साम्राज्य ( Empire ) करणारें होते, ह्मणून या देशास ‘ महाराष्ट्र ’—‘ बलाढ्य राष्ट्र ’ असें नांव पडलें असावें;—ही उपपत्ति आतां विचारी लोकांना मान्य झाली आहे.

महाराष्ट्राची नैसर्गिक रचनाच, अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, त्यात स्वतंत्र विचाराचे, कुशाग्र बुद्धीचे

---

* This name ( Maharasht ) has given rise to Conjectures. It was probably some small tract about where now Dhoolia is in Candeish.

Grant Dubb.

आणि पराक्रमी पुरुष निपजावे. पश्चिमेकडच्या बाजूनें सह्याद्रिपर्वताची रांग असून त्यांत नाना ठिकाणीं डोंगरी किल्ले, चोरवाटा, अवघड घाट अशीं स्थलें आहेत. त्यामुळें तेथें रहाणाऱ्या लोकांना स्वातंत्र्याची आवड असणें साहाजिक आहे; कारण पर्वतमय देशांत रहाणारे लोक निसर्गत: स्वातंत्र्यप्रिय असतात. परंतु महाराष्ट्राची स्वातंत्र्यप्रियता काल देश वर्तमान ह्यांस अनुसरून असते.*

महाराष्ट्रांत मोंगलाखेरीज इतर परकी राजांचा अमल फारच थोडा काळ होता. लहान लहान कां होईना, पण पुष्कळ स्वतंत्र हिंदु राज्यें होतीं. इ. स ७७।७८ ह्या वर्षी प्रतिष्ठान ह्मणजे गोदावरीच्या काठचें पैठण येथें शालिवाहन नांवाचा एक शककर्ता राजा होऊन गेला. त्यानें विक्रमाचा नर्मदेच्या कांठीं पराभव केला. पुढें शालिवाहनाचा वंश एक दोन शतकेंच होता. त्याच्याच वंशापासून जाधव झाले. ठिकठिकाणीं कोरींवलेणीं, मोठमोठालीं देवळें, इत्यादि हेमाडपंती कामें दिसून येतात,

* ह्या पुस्तकांत सध्याच्या कालास अनुसरून स्वातंत्र्यसा अगर त्या सारखा शब्द जेथें येईल तेथें लेखकाचा उद्देश आंग्ल प्रभूंच्या शांत छत्राखालीं राहून इंग्लंडास जे हक्क आहेत, ते त्यांच्याच प्रसादानें मिळवावयाचे इतकाच आहे. ह्याहून स्वातंत्र्य ह्या शब्दाचा कोणत्याही प्रकारें निराळा अर्थ घेऊन त्यानें तो शब्द योजिला नाहीं.

ह्यावरून हिंदुलोकाचें राज्य पुष्कळदिवस असून अशा कामांस पुष्कळ राजाश्रय मिळत होता असें दिसते. तेराव्या शतकात मुसलमान लोकांची वावटळ दक्षिणेंत आली. देवगिरी अथवा दौलताबाद येथें रामदेवराव जाधव म्हणून शालिवाहनाच्या वशांतील एक पुरुष राज्य करीत होता. मुसलमानांचा मुख्य अल्लाउद्दीन खिलजी हा होता. रामदेवराव जाधवानें त्याच्याशीं तह केला. पुढें महमद तघलखानें दौलताबाद हें आपलें राजधानीचें शहर करण्याचा बेत केला. तो दिल्लीस असता त्याच्या कांहीं सरदारांनीं दक्षिणेंत बंड केलें. जाफरखान हा बडखोरांचा मुख्य होता. तो पूर्वी एका ब्राह्मणाजवळ गुलाम होता. त्या ब्राह्मणानें दयार्द्र बुद्धीनें त्यास दास्यमुक्त केलें. जाफरखानानें आपल्या पराक्रमानें राज्य मिळविल्यावर आपल्या उदार धन्याच्या उपकाराची फेड करण्याकरितां आपल्या राज्यास ' ब्राह्मणी राज्य ' असें नाव दिलें. १९२६ सात ब्राह्मणी राज्य बुडून त्याची अदिलशाही, कुतुबशाही, अमदशाही, निजामशाही, आणि बरीद शाही, अशीं पांच राज्यें झालीं. निजमाशाही आणि अदिलशाही राज्यांत कांहीं मराठे सरदार होते. विजापुरकरांच्या ह्मणजे अदिलशाही राज्यात चंद्रराव मोरे, रावनाईकनिंबाळकर, रावमाने, घोरपडे, डफळे वगैरे घराणीं उदयास आलीं. अहेमदनगरच्या ह्मणजे नि-

जामशाही राज्यांत जाधव, आणि भोसले ही मंडळी नावालौकिकास चढली. ह्या भोसल्याच्या कुळात आमच्या चरीत्रनायकाचें जन्म झालें. येथपर्यंत महाराष्ट्राची त्रोटक हकीकत सांगितली. आंता खुद्द चरित्रास आरंभ करूं.

## महाराजांच्या पूर्वजांची संक्षिप्त माहिती.

ज्या नरपुंगवानें हिंदुधर्माची स्थापना करण्यासाठीं शुद्ध बुद्धीनें, खऱ्या कळकळीनें आणि मनःपूर्वक देशाभिमानानें यवनांच्या जाचातून सर्व हिंदूस सोडविलें, ज्यानें महाराष्ट्रधर्म स्थापनेचें ब्रीद जन्मभर चालविलें, ज्यानें महाराष्ट्रभूचें लज्जावस्त्र उद्दाम यवनानीं काढिलें होतें तें पुनः घातलें, गोब्राह्मणाचा प्रतिपाल करून जगांत हिंदु लोक जिवंत आहेत व महाराष्ट्र हें एक सजीव राष्ट्र आहे असें सिद्ध करून दाखविलें, त्या नरश्रेष्ठाच्या शुद्ध, प्रेमळ, आणि वीररसात्मक चरित्राकडे वळण्यापूर्वीं चरित्रनायकाच्या पूर्वजांची हकीकत थोडक्यांत सांगितली पाहिजे, म्हणून आपण तसें करूं.

शिवाजीचें कुलनाम भोसले. हें घराणें मूळापासून जातवान आहे. शिसोदे नामक रजपूत घराण्यातील पुरुषापासून भोसल्याचा वंश झाला. भोसल्याचे मूळ पुरुष बाबाजी भोसले हे होत. त्याना पुणें प्रांतीं पाटस तालुक्यांत देऊळगांवची पाटिलकी होती. बाबाजीचे पुत्र मालोजी आणि विठोजी हे काहीं कारणामुळें दौल-

ताबादेजवळ कसबे वेरूळ येथें मुलांमाणसांसह येऊन शके १४९९ त लखजी जाधवाकडे सिंदखेडयास चाकरीस राहिले. विठोजीस आठ पुत्र झाले. मालोजीस पुष्कळ दिवस संतान होईना. तथापि तो विठोजीचीं मुलें हीं आपलींच मुलें असें समजून आनंद मानी. मालोजीची स्त्री दीपाबाई ही सुशील होती तरी स्त्रीस्वभावास अनुसरून संतति नसल्यामुळें तिला फार खेद होत असे. कांहीं दिवसांनीं 'शहासरीफ' नांवाच्या फकिराच्या प्रसादानें दिपाबाईस दिवस राहिले. नवमास पूर्ण झाल्यावर ती पुत्ररत्न प्रसवली. हा शहासरीफ फकीराचा प्रसाद ह्मणून मालोजीनें मुलाचें नाव 'शहाजी' ठेविलें. शहाजीचें जन्म शके १५१६ त झालें. थोडक्याच दिवसांनीं आणखी एक पुत्र झाला त्याचें नाव 'सरीफजी' ठेविलें. यावरून वाचकास दिसून येईल कीं हीं दोन बाळकें एका सत्पुरुषाची देणगी होती. अर्थात् त्याच्याच वंशात पुढें उत्तम पुरुष निपजावे असा ईश्वरी संकेत होता, आणि त्याप्रमाणें गोष्टी प्रत्ययास आल्या.

सिंदखेड्यास लखजी जाधव म्हणून निजामशाहीतील एक सरदार होते. त्यांस पुत्रसंतान नव्हतें परंतु एकुलती एक सद्गुणी कन्या होती. तिचें नाव जिजाई. ही शके १५१८ सालीं जन्मली. मालोजी भोसले याचे प्रासा-

दिक चिरंजीव शहाजी हे मोठे देखणे होते. एके दिवशीं फाल्गुनमासीं शिमग्याच्या सणात जाधवरावांच्या येथें मालोजी शहाजीस घेऊन गेले तेव्हां सर्व सरदार मंडळी जमली होती. जिजाई जाधवरावाच्या मांडीवर बसली होती. शहाजी जवळच खेळत होता. शहाजी पाच वर्षांचा होता, जिजाईस तिसरें वर्ष होतें. तथापि अशा लहान वयात त्यांना न कळत काहीं अज्ञेय कारणानें एकमेकाच्या मनात पवित्र प्रेमाचे उमाळे येऊन जवळ असलेल्या तबकातील गुलाल घेऊन दोघांनीं एकमेकाच्या अंगावर उधळला. शहाजीचें आणि जिजाईचें वय पाहतां स्त्रीपुरुषाचे प्रेम जडण्याचे दिवस त्यास आले नव्हते, इतकेंच नव्हे तर स्त्रीपुरुषाचें नातें जाणण्याइतकी सुबुद्धही तीं अजून झालीं नव्हती, तथापि ते प्रेमाचे उमाळे कोठून आणि कसें आले हें आम्हासही सागणें अशक्य आहे आणि ह्मणूनच आह्मी त्यांस ' काहीं अज्ञेय कारणाचा परिणाम' असें म्हटलें आहे. जिजाऊ व शहाजी यांची ही पहिली भेट त्यांच्या भावी संबंधाची सूचक होती.

जिजाऊशहाजीचें परस्पर प्रेमाकर्षण पाहून जाधवरावांच्या मनात आलें—नव्हे त्यानें भर सभेत बोलून दाखविलें—कीं हा जोडा फारच चांगला दिसतो. जाधवराव कसा झाला तरी आज मनसबदार आणि आपण य काश्चित पाटील तेव्हां हें होणार कसें, असा संशय मालोजीस येऊन त्यानींहीं आपल्या शंकेचें निवारण करून

घेण्यासाठीं तेथल्यातेथेंच जाधवरावास बजाविलें कीं, आपण पुढें मागें आपल्या व माझ्या लौकिक स्थितींतलें महदंतर जाणून ही गोष्ट नाकाराल. जाधवरावानीं तसें न करण्याविषयीं वचन दिलें. नंतर ही आनंदाची बातमी सांगावयास जाधवराव आपल्या प्रियपत्नीकडे गेले. तिकडे हें वर्तमान अगोदरच समजलें होतें. त्यामुळें जाधवरावानीं गोष्ट काढण्यापूर्वीच त्याच्या स्त्रीनें त्याची कानउघाडणी केली, तेव्हा जाधवरावाचा बेत लागलीच फिरला. नायकाच्या नादीं लागून कित्येक प्रसंगीं पुरुष फसतात ह्याचें हें एक उदाहरण आहे. घरांतून हुकूम होतांच जाधवरावानीं मालोजीस असें कळविलें कीं, तुमचें आमचें जें बोलणें झालें तें निवळ थट्टेचें होतें. तुमची आमची सोयरीक होऊं शकत नाहीं. केवळ आपल्या हीनस्थितीमुळें जाधवरावानें आपलें वचन मोडलें, ह्यामुळें मालोजीस अत्यंत खेद होऊन रागही आला. तो आपलीं मुलें माणसें घेऊन वेरूळास परत आला. तो मुळचाच शिवभक्त होता आणि त्यातून जाधवरावानें केलेला अपमान सहन न होऊन आपले दुर्दिन पालटण्यासाठीं त्यानें अधिक व्रतें उद्यापनें केलीं. शिवप्रसादानें त्यास विपुल द्रव्य मिळालें. नंतर चांभारगोंदाचे शेषाबानाइक ह्यांच्या सल्लामसलतीनें नगपाळ निंबाळकर व फलटणकर यांची फौज मदतीस घेऊन जाधवरावाच्या पारिपत्यासाठीं तो निघाला. दौलताबादेजवळ येऊन बादशहास ही हकीकत कळवि-

त्यावर बादशहानें जाधवरावास दौलताबादेस आणविलें तेथें त्यांस रागे भरून आपली देऊं करून नाकारलेली मुलगी जिजाई शहाजीस देण्याचा हुकूम केला. जाधवरावास बादशहाचा हुकूम मोडता येईना, तेव्हां निरुपायानें बादशहाचे इच्छेप्रमाणें शके १५१६ त लग्नसमारंभ दौलताबादेस जाहला. मालोजीस व विठोजीस बादशहाकडून बारा हजार फौजेची मनसब मिळाली. मालोजीनें पुष्कळ दानधर्म केला. ठिकठिकाणीं विहिरी बांधल्या. साताराप्रांतीं चैत्र महिन्यांत शंभु महादेवाची यात्रा भरते तेथें पाण्याचे फार हाल होतात, असें पाहून तेथेंही मालोजीनें एक मोठें तळें बांधिलें. इतक्या सुमारास शहाजीचे वयास वीस पंचवीस वर्षें झालीं. जिजाऊस पुत्ररत्न झालें. त्याचें नांव संभाजी ठेवलें.

पातशहाकडून मालोजीनें आपल्यास सोयरीक करण्यास भाग पाडलें, त्यामुळें उत्पन्न झालेला क्रोधाग्नि जाधवरावाच्या मनांत धुमसतच होता. मनुष्य एकदा विकारवश झाला ह्मणजे त्यास प्रत्यक्ष आई, बाप, बंधु, हे सुद्धां शत्रू दिसूं लागतात, मग सोयऱ्या धायऱ्याची गोष्ट लांबच! मालोजीचा सूड आणि वेळ साधल्यास पातशहाचाही सूड केव्हां उगवीन असें जाधवरावास झालें. प्रत्यक्ष जावयाचें वैभव त्यास सहन होईना. त्यानें दिल्लीच्या बादशहाचें मन वळवून त्याचेकडून दौलताबादे-

वर स्वारी करण्याचा घाट घातला. मीरजुमला आणि जाधवराव हे दौलताबादेवर चालून येतात हें पाहून शहाजी पातशहाच्या बायका घेऊन कोकणांत माहुली-च्या किल्ल्यांत जाऊन राहिला. तेथून विजापूरकरांशीं स-धान बांधून शहाजी आपला पुत्र संभाजी यासह तिकडे निघून गेला. तिकडे जाण्यापूर्वी त्यानें जिजाऊस शिवने-री किल्ल्यांस पोंचती केली. तेव्हा ती गरोदर होती. जि-जाबाई शिवनेरी किल्ल्यांत आल्यावर तिला अत्यंत वाईट वाटलें. एक तर ती गरोदर होती, शिवाय बापाचें व यजमानाचें वैर म्हणून आपल्यास यजमान सोडून गेले, तेव्हां आतां पुढें कसें होईल, त्यांचें मन सुप्रसन्न को-णत्या रीतीनें करून घेतां येईल, अशी तिला रात्रंदिवस काळजी लागली. शिवनेरी किल्ल्यांतील शिवाई देवीची ती सेवा करूं लागली. नव मास पूर्ण झाले. शके १५४९ च्या वैशाख शुद्ध द्वितीयेचा दिवस उगवला. त्या दिवशीं, गोब्राम्हणप्रतिपालनकर्ता, हिंदुधर्मरक्षक, हिंदुपदबादशाहीचा स्थापक असा मुलगा जन्मला. शिवाई देवीचा हा प्रसाद म्हणून त्याचें नांव शिवाजी ठेविलें. हिंदुधर्माचे अंधकाराचे दिवस जाऊन त्याच्या उदयाचा आणि भरभराटीचा काल समीप आला असें सुचविण्या-साठींच कीं काय महाराजाचा जन्म शुद्ध द्वितीयेस झाला, कारण शुद्ध द्वितीयेचा चंद्रही वाढत्या कले-नरच असतो.

## महाराजांचें बालपण.

शहाजीराजे विजापुरास गेल्यावर त्यांनी विजापूरकरांच्या पुष्कळ कामगिऱ्या बजावल्या. त्यांनीं पुणें प्रांतीं बरीच जहागीर संपादन केली, आणि दादोजी कोंडदेव जोशी कुळकर्णी मौजे हिंगणी बेरडी हा इमानी नौकर जाणून त्याचे स्वाधीन ती जहागीर करून शिवाजीवर देखरेख करण्यास आणि सर्व कारभार पाहण्यास त्यासच सांगितलें. शिवाजीस व जिजाईस इ० स० १६३७ त पुण्यास दादोजीजवळ ठेवलें. दादोजी हा कुळकर्णी पण मोठा कारस्थानी पुरुष होता. शिवाजीस त्यानें लहानपणापासून उत्तम तऱ्हेचें शिक्षण दिलें. त्यास सर्व प्रकारच्या शारिरिक शिक्षणांत निपूण केले, धार्मिक आणि नैतिक शिक्षणाचें बीज त्याच्या मनात पेरलें. भारतातील आणि रामायणातील वीररसप्रधान आख्यानें वारंवार त्याच्या कर्णपथावर घालून त्याच्या आंगीं देशाभिमान आणि धर्माभिमान जागृत केला. तथापि आपण शहाजी राजाचे नौकर आणि शहाजी राजे विजापूरकराचे सरदार, तेव्हा शिवाजीच्या मनांत विजापूरकरांविषयीं जितकें प्रेम उत्पन्न होईल, मुसलमान पादशाहीविषयीं जितका गैरसमज न होईल, तितका करण्याविषयीं त्यानी अतिशय काळजी घेतली. परंतु दादोजीच्या ह्या शिक्षणाचा महाराजाच्या मनावर कांहीं एक परिणाम होईना. आणि तसें होण्यास तशींच कारणें होतीं. जिकडेतिकडे अविंधशाहीचा जुलूम लोकांस सहन

होईना. परकीयाचे अमलाखालीं रहाण्याचें एकवार लोक पत्करतील, परंतु त्याच्या धर्मांत जर परकी राजे हात घालूं लागले तर मात्र तें त्यांस सहन होणार नाहीं. शिवाजी महाराजास मुसलमानशाहीचा कंटाळा आला तो राजकीय कारणानीं नव्हे, तर हिंदुधर्मानें अत्यंत पवित्र मानलेल्या गोष्टीचा अविंधाकडून नाहक छळ होऊं लागला म्हणून. गोमातेचा वध, ब्राह्मणाची सुंता नाहीं तर सूळ, असा प्रकार अगदीं अज्ञान हिंदूस देखील खपावयाचा नाहीं, मग मुळचीच ज्याच्या अंगांत वीरश्री असून भारत रामायणांतील युद्धाच्या कथा ऐकून ज्याचे बाहू स्फुरण पावू लागले होते, त्याना आपल्या धर्माचा डोळ्यापुढें छळ होत असता मुकाट्यानें कसें बसवेल ? अर्थात हिंदूधर्मरक्षणाची अत्यंत पवित्र कल्पना त्या नरवीराच्या मनात बाणली, व तेव्हाचा काळच असा होता कीं हिंदूधर्माचें रक्षण करणें स्वराज्यस्थापनेशिवाय अशक्य होतें. एवढ्याचसाठीं स्वराज्यस्थापनेची कल्पना महाराजाच्या मनात आली. त्या कल्पनेचे अंकूर दादोजी कोंडदेवास पहिल्यापासूनच दिसू लागले. त्याना एक प्रकारें अत्यानंद झाला, परतु दुसऱ्या बाजूनें आपल्या शिक्षणाचा असा चमत्कारिक परिणाम झालेला पाहून आपले धनी शहाजी राजे यांची इतराजी होईल आणि त्यानीं आपण इमानी नोकर असें समजून आपले हातीं सर्व कारभार व अधिकार दिला त्याचा आपण दुरूपयोग केला असें त्यांच्या मनांत गेईल असें वाटून त्यास अत्यत खेद झाला.

एकवार महाराजांस शहाजी राजांनीं विजापुरास नेलें होतें. तेथें दरबारांत गेल्यावर शहाजी राजांनीं पातशहास लवून सलाम केला, परंतु शिवरायांनीं यवनांपुढें मान लववावयाची नाहीं असा जन्मतःच निश्चय केला होता कीं काय न कळे, ते सलाम न करता तसेंच दरबारांत शिरले. शहाजीनें मुलाचें वर्तन पाहून त्यास येथें राहूं देणें फार धोक्याचें आहे असें तेव्हाच ताडलें आणि त्यास परत पुणें प्रांतीं पाठविलें. तेथें सद्गुरु दादोजी कोंडदेव आणि सच्छिष्य शिवाजी महाराज यांची जोडी जमून त्यांनीं त्यास दांड पट्टा, नेम धरणें, घोड्यावर बसणें वगैरे सर्व शिपाईगिरीचीं कामं शिकविल्याचें वर आलेंच आहे.

स्वधर्म रक्षणाची उच्चतम कल्पना शिवरायाच्या मनांत आल्यापासून त्यांनीं नानाप्रकारचे उद्योग आरंभिले. ठिकठिकाणच्या मावळे लोकांशीं मैत्री संपादन करून लहान वयांत ते अनेक कारस्थानें करूं लागले. ज्या वीरानें आपल्या स्वतःच्या हिंमतीवर वयाच्या केवळ एकोणीसाव्या वर्षीं तोरणा किल्ला सर केला, त्यानें आपल्या उद्योगास किती लहान वयात आरंभ केला असावा, याची कल्पना वाचकांनीच करावी.

हॅनिबालनें वडिलाची आज्ञा शिरसा वंद्य करून लहानपणापासून देशकार्यीं आपला देह खर्ची घालण्याचा दृढ निश्चय केला, इतालीच्या मॅझिनीस पारतंत्र्याचा वीट

येऊन त्यानें आपल्या नवव्या वर्षापासूनच सुतक्याचा पोषाख चढवून हातात तलवार धरिली. या सर्व गोष्टी जर खऱ्या असतील आणि इतिहासाची पुनरावृत्ति होते ही म्हण जर खरी असेल, तर शिवाजीनें तोरणा किल्ला एकोणिसाव्या वर्षी घेतला ही गोष्ट खरी असूं शकेल, कारण मुलाचे पाय पाळण्यात दिसूं लागतात असें इतिहास देखील सांगतो.

तोरणा किल्ला हस्तगत झाल्यावर शिवाजीनें कोंकणांत कल्याण भिवंडी मारली. ह्या प्रसगीं शिवरायाच्या एका अलौकिक सद्गुणाची परीक्षा झाली, ती अशी — आबाजी सोनदेव ह्मणून रायाच्या पदरीं एक नौकर होता. त्याच्या हातीं एक रूपवती यवन कन्या लागली. महाराजांस ही लूट नजर केल्यास आपणावर त्यांची मर्जी बसेल ह्मणून त्यानें ती खबर शिवरायास दिली. परस्त्रीस मातेप्रमाणें लेखणाऱ्या रायास ह्यापासून आनंद न होतां त्यास आबाजी सोनदेवाच्या वर्तनाचा उलट तिटकारा आला. त्या स्त्रीस मातेसमान लेखून शिवरायानें तीस आपल्या माणसात नेऊन पोंचविलें. अशा नीतीमान राजाबद्दल कोणास अभिमान वाटणार नाहीं ? असो.

शिवरायानीं चालविलेल्या पुंडाईची बातमी विजापूर दरबारीं पोंचल्यावर महाराजांस विजापूरकरांचा निरोप आला कीं, आपण आमच्या हाताखालील नौकर असतां

देशात असा पुंडावा माजवून रयतेस त्रास देतो हें ठीक नाहीं; आपण समक्ष हुजूर यावें, तुम्हास जें हवें असेल तें देऊं. यानंतर महाराजांनीं सर्व मंडळीस सल्ला विचारला. तसाच आपल्या प्रिय पत्नीसही विचारला. त्या माउलीनें मोठ्या विनयानें, मी जातीची स्त्री अज्ञान मला काय विचारावें असें सांगितलें. परंतु महाराजाचे तेवढ्यानें समाधान होईना; तेव्हां सईबाईनीं सांगितलेल्या सल्याचा बखरींतून उल्लेख आहे तो असा.—" महाराजाचे वडील हुजूर आहेत, महाराजानीं पादशाही किल्ले घेतले, खजिना लुटला, मारला; याजकरितां हुजुर जावें हा सल्ला नाहीं. वडिलावर दृष्टी देऊंन, जाल तेव्हां बरें कसें दिसेल! राज्य करावें असें असेल तर श्री शंकरजीस शरण जावें. श्री जें नेमून कार्य करील तें पहावें. **राज्य करणें त्यास मोह कैचा** ? कमरेस दोली बांधावी* पुढे जें होणें तें होईल." त्या वीरपत्नीचा हा उपदेश ऐकून कालिदासाच्या ' गृहिणी सचिव सखी मिथः' ह्या उक्तीची आठवण होते. सर्वज्ञ भगवान श्री कृष्णानीं अर्जुनास तूं मोहपाशात पडूं नकोस असाच उपदेश लढाईचे वेळीं केला तो तर सर्वांस वंद्य आहे. परंतु या आर्यभूमींत वेळप्रसंगीं स्त्रियांच्या हातूनही उत्तम प्रकारचे उपदेश, अतुल पराक्रम, वर्णनीय औदार्य झाल्याचीं उदाहरणें पाहून मनास एक प्रकारचा अभिमान वाटतो.

---

* कमरेस दाली बांधावी =लढाईस तयार व्हावे.

शिवाजीनें असा पुंडावा माजविला आहे हें पाहून विजापूरकरास काळजी उत्पन्न झाली आणि हा कांटा राज्यांतून कोणत्या प्रकारें काढून टाकावा ह्याविषयीं बडे साहेबिणीच्या दरबारांत खलबतें सुरू झालीं. शहाजी-स धमकी देण्यांत आली. शिवाजी माझें ऐकत नाहीं, मी त्यास ह्या बाबतींत पुष्कळ पत्रें लिहिलीं, परंतु कांहीं उपयोग नाहीं, अशा अर्थाचें उत्तर शहाजीराजानें पाठविलें, इतकेंच नव्हे तर दरबाराची खात्री होण्याकरितां शिवाजीकडून आलेलीं पत्रेंही पाठविलीं; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शिवाजीच्या ह्या कृत्यास शहाजीचें अंग असलें पाहिजे हा जो विजापूरकराचा एकदा दुराग्रह झाला तो दूर होईना. शेवटीं शहाजीस कांहीं शासन केल्याखेरीज शिवाजीचा पुंडावा कमी होणार नाहीं, असें समजून बाजी घोरपडे यास शहाजी राजांस कैद करून आणण्याकरितां पाठविलें. त्यानें विश्वासघातानें हा डाव साधला. शिवाजीनें वेळ जाणून बापाची सुटका करण्याकरितां शहाजहान बादशहाकडे संधान बांधिलें आणि विजापूरकरास दपटशहा देऊन बापाची सुटका करविली. बाजी घोरपड्याच्या विश्वासघाताचा सूड पुढें एके प्रसंगीं शिवाजीनें उगविला.

## चंद्रराव मोरे.

तोरणा किल्ला घेतल्यानंतर महाराजांच्या मोठ्या कामांपैकीं चंद्रराव मोरे ह्याचा वध हें एक होय. चिटणीस,

सभासद, आणि मराठी साम्राज्याची बखर, ह्या तिन्हीं बखरी ताडून पाहता चंद्रराव मोरे याच्या मरणा संबंधानें एकच हकीकत सांपडते. जावळीचे राजे चंद्रराव मोरे हे विजापूरच्या पातशहास दरसाल खंडणी देत असत. त्या-च्याकडे रघुनाथ बल्लाळ सबनीस ह्यास काहीं निवडक लोकांनिशीं शिवाजीनें पाठविले. त्यानीं चंद्रराव मोरे याची एकांती भेट घेऊन त्यास कट्यारीचा वार करून जिवें मारिलें. चंद्ररावाचा भाऊ हणमतराव मोरे ह्यासही संभा-जी कावजीनें अशाच रीतीनें मारिलें. मोरे याच्या स्त्रिया व कन्या होत्या त्यास सोडून दिले. चंद्रराव मोरे याच्या मृत्यू विषयीची हकीकत बहुतेकअशी एक सारखीच आ-हे. फक्त बडोदा येथें प्रसिद्ध झालेल्या शिवदिग्विजय नाम-क बखरींत रघुनाथ बल्लाळ अत्रे ह्यानीं चंद्रराव मोरे या-शीं युद्ध केलें आणि मोरे पुष्कळ वेळ झुंजून लढाईंत पडले असें आहे. हीच हकीकत खरी असुन सर्व उपलब्ध बखरींतून असती तर फार चांगलें झालें असतें. परंतु ज्या अर्थी इतर विश्वासनीय बखरींतून महाराजांनीं चंद्र-राव मोरे याचा वध करविला असाच लेख सांपडतो, त्या अर्थी तीच हकीकत खरी आहे असें समजून महाराजा-च्या तर्फे काहीं लिहिता आल्यास पाहूं.

•सभासद आणि चित्रगुप्त या दोन्हीं बखरींत “ चंद्र-राव मोरे यास मारल्या खेरीज राज्य साधत नाहीं ” “को-कणांत जावळी येथें चंद्रराव जबरदस्त हशम-गड- कोट युक्त दौलत करीत असतां त्यास मारल्या खेरीज .राज्य

साधत नाहीं " अशीं वाक्यें आहेत. परंतु महाराज अत्यंत पराक्रमी होते तर त्यांनीं धर्मयुद्ध करून चंद्रराव मोऱ्याचा नाश करावयाचा होता, परंतु तें सोडून खुनासारख्या नीच कृत्यास प्रवृत्त व्हावयाचें नव्हतें, असा उलट पक्षाकडून आक्षेप येणें अगदीं सहाजिक आहे. यास उत्तर इतकेंच कीं एकें तर चंद्रराव मोरे त्या वेळीं बलाढ्य राजा असून विजापूरकरांच्या अगदीं अंकित होता. 'चंद्ररावास मारल्याखेरीज राज्य साधत नाहीं' ह्या शिवाजी महाराजांच्या भाषणावरून त्यांची आणि चंद्रराव मोऱ्याचीं मतें भिन्न असलीं पाहिजेत. हिंदूंचा छळ, गाईंचा वध, देऊळांचा नाश, हीं पाहून एकाच्या अंगाचा तिळपापड होत असेल तर दुसऱ्याकडून ह्या गोष्टीस पाठबळ जरी नसलें तरी संमति असली पाहिजे. नाहीं तर चंद्ररावासारखा बलाढ्य मराठा गडी आपल्यास लाभत असता शिवाजी महाराजांनीं त्याचा वध करविला नसता. महाराजांच्या एकंदर चरित्रावरून असे देखील अनुमान करण्यास जागा आहे कीं त्यांनीं आपल्या देशाची हीन स्थिति व धर्मास आलेली ग्लानी हीं सर्व चंद्रराव मोऱ्यास समजावून सांगून त्यास आपल्यास येऊन मिळण्याविषयीं विनंती केली असेल; चंद्ररावानें ती नाकारली असेल, आणि मग महाराजांनीं निरूपायास्तव शेवटचा उपाय केला असेल; परंतु अशी हकीकत अजून कोणत्याच बखरींत सांपडत नाहीं.

कदाचित पुढें मागें महाराजाच्या वेळचीं कागदपत्रें सां-पडून ह्या गोष्टीचा निकाल लागेल. तथापि तो पर्यंत वरील अनुमान अगदींच चुकीचें असेल असें वाटत नाहीं. कार्याच्या महत्त्वाकडे आणि सद्धेतूकडे लक्ष दिलें म्हणजे तदर्थ योजलेलीं साधनें क्वचित् प्रसंगीं गर्हणीय असलीं तरी हरकत नाहीं. आपल्या स्तुत्य हेतूंच्या आड चंद्रराव मोरे येत आहे असें पाहून शिवाजीस त्यास दूर करणें जरूर होतें. घरातील मनुष्य बेफाम होऊन आपल्या स्वतःच्या घरास आग लावण्यास तयार झाला असेल तर मोहपाश आणि सामान्य दररोजच्या आच-रणांची नीतितत्त्वें क्षणभर बजूस ठेवून त्या मनुष्यास काट्याप्रमाणें उपटून टाकणें हें, ज्यास तें घर मोडकळीस आलेलें पाहून पुनः बांधण्याची इ-च्छा असेल व अंगीं शक्ती असेल, त्याचें कर्तव्य होय.

बापाची सुटका झाल्यावर शिवाजीचा पूर्वक्रम सुरू झाला. चंद्ररावाचा वध करविला हें नुकतेंच सांगितलें. शिवाय आज हा किल्ला सर कर तर उद्या तो मुलुख घे यांत अंतर पडेनासें झालें. विजापूरकरास ह्या शत्रूचें पा-रिपत्य कसें करावें ही मोठी काळजी पडली. शेवटीं अ-फजुलखान नामक एका बलाढ्य परंतु गर्विष्ठ सरदारानें शिवाजीस " चढे घोड्यानिशी " जिवंत कैद करून घेऊन येतो असा विडा उचलिला. बरोबर सर्व सज्जता करून अफजुलखानाची स्वारी निघाली. वाटेनें तुळजा-

पूरची देवी फोडिली. पंढरपूरच्या श्री विठोबास त्रास दिला. आणि कूच करीत करीत स्वारी वाईस आली. अफजुलखान बारा हजार फौजेनिशी आला आहे हें शिवाजीस समजताच त्याशीं जावळीस सामना करण्या करितां शिवाजीनें बेत केला. परंतु शिवाजीच्या ह्या बेतास त्याच्या मंत्र्यानीं हरकत घेतली. त्याच्या मतें अफजुलखानाशीं सल्ला करावा असें होतें. शिवाजी महाराजानीं मंत्र्याचा हा उपदेश बाजूस ठेवून आपला युद्ध करण्याचा निश्चय तडीस नेला असता परंतु ते पूर्ण इश्वरभक्त होते. श्री भवानीची आपल्यावर पूर्ण कृपा आहे आणि संकट समयीं ती आपल्यास कोणत्या मार्गाचा स्वीकार करावा तें सांगते अशी त्याची दृढ समजूत होती. तुळजापूरच्या भवानीनें स्वप्नात येऊन त्यांस सांगितलें, मी प्रसन्न जाहले सर्वस्वी साह्य तुला आहे तुझें हातें अफजुलखानाला मारवितें तुजला यश द्वेते तू कांहीं चिंता करूं नकोस. श्री भवानीचा असा वर मिळाल्यावर रणांगणीं दोघाचे दोन हात होणें हेंच चागलें असें शिवाजीस वाटलें, त्याप्रमाणें ते अजूनही युद्धाच्याच तयारींत होते. जावळी हें ठिकाण शिवाजीस फार सुरक्षित होतें, त्यामुळें खानास त्यानें तेथें बोलाविलें. खाना कडून कृष्णाजीपंत वकील सल्ला करण्यासाठीं आले. अफजुलखानाच्या मनांत कांहीं काळेंबेरें आहे किंवा काय याचा बारकाईनें शोध काढण्याकरितां महाराजांनीं कृष्णाजीपंत परत जातांना त्याच्याबरोबर आपल्याजवळील विश्वासू प्रहस्थ गोपीनाथपंत यास पाठ-

विलें, आणि भेटीचाच योग असल्यास कसेंही करून खानास जावळीस आणावें असें त्यास सांगून ठेविलें. गोपीनाथपंतांनीं वजीराची मूठ भरून खानाच्या मनांतील हेतू काढून घेतला. त्यावरून लबाडीनें शिवाजीस धरावा असें खानाच्या मनांत आहे असें गोपीनाथपंतास कळलें. गोपीनाथपंतांनीं सर्व हकीकत महाराजास निवेदन केली. खानाच्या मनात दगा आहे तर आपणही तसेंच वागलें पाहिजे असें ठरवून शिवाजीनें गोपीनाथपंतास परत नाईंस खानाकडे पाठविलें, आणि शिवाजी अति भित्रा आहे आपणच जावळीस एकटे आल्यास आपल्या चरणीं तो हजर राहील, असें कळविण्यास सांगितलें.

शिवाजीनें चोंहोंकडे मावळे लोक ठेऊन कडेकोट बंदोबस्त केला होता. खानाच्या भेटीसाठीं जागा उत्तम प्रकारें शृंगारली. विजापूरकराच्या दरबारातही ज्या वस्तू दिसणार नाहींत अशा सुंदर वस्तूनीं ती जागा सुशोभित केली. नेटाजी पालकर वगैरे लष्करी मंडळीस नीट बंदोबस्त करण्यास सांगितलें. खान सशस्त्र असून त्याच्या बरोबर सय्यदबांडा ह्मणून एक बलाढ्य शिपाई होता. खानाच्या मनांत दगा आहे असें समजल्यावरून शिवाजीनें अंगांत चिलखत घातलें, डाव्या हातात वाघनख आणि उजव्या हातांत बिचवा अशीं लपवून ठेविलीं. महाराजांनीं आपल्या बरोबर संभाजी कावजी व जिऊ महाला असे दोघे

जिवास जीव देणारे गडी घेतले. महाराजांची आणि खां-नाची भेट होताच खानानें शिवाजीची मान खाकेखालीं दाबली आणि कुशींत तरवारीचा वार केला. तेव्हां शिवाजीसही आत्मरक्षणार्थ आपल्या वाघनखाचा आणि बिचव्याचा उपयोग करावा लागला. वाघनखानीं खाना-चीं आतडीं बाहेर काढलीं. सय्यद बाडा ह्यास मारिलें. जवळ असलेल्या भोयानीं खानास पालखींत घातलें तेव्हां संभाजी कावजीनें त्यांचे पाय तोडले. गडावर जाऊन खुणेसाठीं तोफेचा आवाज केला तेव्हां चोहोंकडून माव-ळे लोक येऊन त्यानीं अफझुलखानाच्या सैन्याची दुर्दशा केली.

ह्याप्रमाणें अफझुलखानाच्या वधाची हकीकत आहे. शि-वाजी विश्वासघातकी होता असा जो त्याच्यावर आरोप येतो तो मुख्यत्वेंकरून चंद्रराव मोरे याचा वध आणि अफझुलखा-नाचा वध ह्या दोन गोष्टींवरून येतो. त्यापैकीं चंद्रराव मोऱ्यां-च्या वधासंबधानें आह्मांस थोडेंसें लिहावयाचें तें लिहिलें च आहे. आता अफझुलखानाच्या वधासंबधानें शिवाजी-वर वरील आरोप कितपत लागू पडतो तें पाहूं.

अफझुलखानाच्या संबधानें विचार करितांना खालील गोष्टी विशेष महत्वाच्या आहेत असें वाटतें.

( १ ) अफझुलखान शिवाजीच्या केवळ भेटीस आला होता काय?

( २ ) अफझुलखान इतका बेसावध का होता ?

( ३ ) अफझुलखानाच्या बेसावधपणाबद्दल शिवाजीस कितपत दोष देता येतो ?

अफझुलखान पहिल्यानें विजापुराहून निघाला तो शिवाजीस जिवंत धरून पादशहाच्या दरबारांत आणितों अशा शर्तीनें निघाला. त्यास आपल्या शौर्याचा गर्व फार असे. वाईकडील मुलूख त्यास माहित होता. मराठ्यांची युद्धपद्धतीही त्यास माहीत होती. तेव्हां अशा डोंगराळप्रांतीं मराठ्यांशीं सामना देणें फायदेशीर होणार नाहीं असें अफझुलखानास वाटलें असावें, आणि म्हणूनच त्यानें शिवाजीशीं सल्ला करण्याचा बेत करून कृष्णाजीपंतास शिवाईस पाठविलें. येथें हेंही लक्षात ठेविलें पाहिजे कीं, अफझुलखानासारखा सरदार आपण कोणत्या कामासाठीं आलों हें अगदीं विसरून गेला असेल असें नाहीं. शिवाजीस जिवंत धरून न्यावयाचें ह्या महत्वाकांक्षेनें लावलेलें वेड अजून नाहींसें झालें नसावें, आणि तीच गोष्ट गोपीनाथपंतानें वजीरापासून काढून घेतली असावी. ह्यावरून शिवाजीची भेट घेण्यात अफझुलखानाचा बेत त्यास मारण्याचा नसला तरी धरण्याचा खास असला पाहिजे, आणि ही गोष्ट शिवाजीच्या आक्षेपकांनींही कबूल केली आहे.

अफझुलखानाच्या तर्फेच्या लोकाचें ह्मणणें असें आहे कीं, त्याच्या मनात जर कपट असतें तर इतक्या साध्या

रीतीनें तो शिवाजीस भेटण्यास आला नसता. परंतु हें खरें नाहीं. अफझुलखानास शिवाजीची माहिती असावी तशी नव्हती. शिवाय त्यास आपल्या स्वत:च्या शौर्याची व मनगटाच्या शक्तीची विशेष घमेंड होती. वेळ प्रसंग आला तर आपण शिवाजीवर हात टाकला तरी उलट आपल्या अंगावर हात टाकण्याची शिवाजीची छाती नाहीं अशी खानाची समजूत असली पाहिजे, आणि म्हणूनच खानानें आत्मरक्षणार्थ चिलखत वगैरे घालण्याची कांहींच व्यवस्था केली नसावी. शिवाजीचें तसें नव्हतें. तो फार धूर्त होता. शिवाय खानाचा बेत आपणास धरावयाचा आहे हें गोपीनाथपंताकडून त्यास पक्कें समजलें होतें. म्हणून तो सर्व तयारीनें खानाच्या भेटीस जाण्यास सिद्ध झाला. अफझुल आपल्या आढ्यतेनें गाफिल राहिला.

अफझुलखान अशा रीतीनें गाफिल असतां शिवाजीनें त्याच्या पोटांत वाघनखें खुपसलीं आणि कट्यारही चालविली, हा मोठा विश्वासघात केला असें प्रतिपक्षाचें म्हणणें आहे. परंतु सभासदाच्या बखरीवरून——आणि हीच बखर पुष्कळ अंशीं विश्वसनीय मानिली आहे—अफझुलखानानें अगोदर तरवारीचा वार शिवाजीच्या अंगावर केला असें दिसतें. अफझुलखानाचा उद्देश कदाचित शिवाजीस जिवें मारण्याचा नसेल, परंतु एकांतीं भेटींत त्यास घायाळ केल्याशिवाय धरून नेणें शक्य नव्हतें, आणि येवढ्याचकरितां खानानें शिवाजीस वार

केला असावा, अशा वेळेस एखाद्या वीरानें नीतीची भलतीच कल्पना मनांत आणून आत्मरक्षणार्थ अगदीं हातपाय न हालविणें ह्मणजे आपण निवळ भागुबाई आहोंत असें दाखविणें होय. ह्मणून शिवाजीस आपल्या वाघनखाचा उपयोग करावा लागला. अफझुल खानास मारण्याचा त्याचा बेत पहिल्यापासून होता असेंही धरून चाललें तरी तो प्रसंग खानानें स्वतः आणून दिला. ह्या कृत्यास शिवाजीपेक्षा खान अग्रेसर झाला. पहिला वार खानानें केला आणि मग शिवाजीनें आत्मरक्षण केलें, अशी वस्तुस्थिती आहे. ह्यावरून शिवाजीवर विश्वासघातकीपणाचा आरोप लादण्यात येतो तो मृथा आहे असें दिसून येईल. शिवाजीनें केलें तें आत्मरक्षणार्थ केलें असाच त्याचे बाजूनें पुरावा आणिता येतो.

आणखी एका मुद्यासंबंधानें विचार करूं. शिवाजीच्या मनांत पहिल्यापासूनच खानास कपटानें मारावें असें होतें आणि त्या कृत्यास त्याच्या आईचें अनुमोदन मिळून त्यानें तिचा निरोप घेतेवेळीं ' तूं यशस्वी होशील ' असा आशीर्वादही दिला असें कित्येकांचें ह्मणणें आहे. शिवाजीच्या आईनें त्यास ' तूं यशस्वी होशील ' असा आशीर्वाद दिला पण तो केव्हां हें पुरतें न पाहतां मधलेंच एक वाक्य उचलून घेऊन आपल्या ह्मणण्याचें समर्थन करणें चांगलें नाहीं. ज्या ठिकाणीं " शिवबा विजयी होशील " असें वाक्य बखरींत आहे तेथील पुढचा

उतारा येथें दिला असतां त्या वाक्याचा संबंध कोणीकडे पोंचतो हें वाचकांच्या लक्षांत येईल.

" राजे बोलिले ' सल्ला केलियानें प्राणनाश होईल, युद्ध केलियानें जय जाहलियास उत्तम, प्राण गेलियानें कीर्ति आहे..................याजकरितां युद्ध करावें हें खरें. आतां एकच तजवीज करावी. संभाजी राजे पुत्र व मातोश्री आहेत तीं रायगडीं ठेवावीं. जर अफझुलखान मारून जय झाला तरी माझा मीच आहे. एखादे समयीं युद्धीं प्राणनाश झाला तर संभाजी राजे आहेत त्यास राज्य देऊन त्याचे आज्ञेनें तुम्हीं राहणें. ' अशी निर्वाणूक करून सर्वांस सांगून मातुश्रीच्या पायावर डोई ठेऊन निरोप घेतला. मातुश्रींनें आशिर्वाद दिला कीं ' शिवबा विजयी होशील. "

ह्या उताऱ्यावरून लोकांच्या ध्यानांत येईल कीं शिवाजी महाराजाचा बेत पहिल्यापासून अफझुलखानाशीं लढाई करण्याचा होता. परंतु तो प्रसंग अफझुलखानानें स्वतः होऊन टाळला. लढाईवांचून युक्तिप्रयुक्तीनें शिवाजीशीं सल्ला करून त्यास धरण्याचा बेत केला. त्याप्रमाणें तो जावळीस आला, शिवाजीची भेट घेतली, आणि आपला हेतु साधण्याकरितां त्यानें शिवाजीस वार केला.

आणखी एक मुद्दा राहतो तो एवढाच कीं शिवाजीस अफझुलखानानेंच वार अगोदर कशावरून केला? सभासद वगैरे बखरकाराच्या बखरीवरून जरी हें सिद्ध होतें तरी त्यानें पक्षपातानें कशावरून लिहिलें नसेल? परंतु

त्या बखरी बऱ्याच विश्वसनीय आहेत अशी आजपर्यंत समजूत आहे. शिवाय हें कृत्य पुढें सांगण्यास अफझुलखानाच्या जवळ जे दोन चार लोक होते ते कोणीच जिवंत राहिले नव्हते. खानानें ' दगा ' ' दगा ' असा शब्द केल्यावर सय्यदबांडा धांऊन आला. परंतु तोही प्राणास मुकला व इतर दोन चार लोकांचीही तशीच व्यवस्था लागली. शिवाजी, संभाजी कावजी, हिरोजी फर्जंद, तानाजी मालुसरा, हीं मंडळी तेथें होती. आणि त्यांच्याच तोंडची हकीकत खरी मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

अफझुलखानास हिंदुधर्माचा अति तिरस्कार असे. त्याची विटंबना करावी अशी त्याची मनापासून इच्छा होती. विजापुराहून येताना वाटेनें तुळजापुराची देवी फोडली, पंढरपुराचा विठोबा बाटविला, असें सभासदांच्या बखरींत आहे. अफझुलखानाच्या तर्फेची मंडळी म्हणतात कीं ' बडोदा बखरींत ' याहून निराळी हकीकत आहे. आणि त्यावरून अफझुलखानावर हिंदूंचे देव भ्रष्ट केल्याचा जो आरोप आहे तो खोटा आहे. आपल्या बाजूच्या समर्थनासाठीं आपल्या पुराव्यापुरती माहिती मिळेल तितकीच दुसऱ्या पुस्तकावरून घ्यावी, परंतु मग प्रतिपक्षानें तेंच पुस्तक पुराव्यास आणिल्यास व त्याच पुस्तकांतून तुमचीं इतर विधानें खोटीं ठरल्यास प्रतिपक्षाचें म्हणणें कबूल केलें पाहिजे. बडोदा बखरींत अफझुलखानानें देवी फोडिली

नाहीं तर ती आपण होऊनच नाहींशी झाली असा मजकूर आहे हें खरें, परतु त्याच बखरींत अफझुलखानाच्या वधाची हकीकत सभासदाच्या बखरीप्रमाणें आहे. शिवाय त्या बखरींत चंद्रराव मोऱ्याचा खून न करितां शिवाजीच्या सरदारांनीं मोऱ्याशीं युद्ध केलें असें आहे. तेव्हां प्रतिपक्ष पुराव्यासाठीं ह्मणून ज्या ग्रंथाचा आधार घेतो तीच बखर चंद्रराव मोऱ्याच्या खुनाच्या आरोपातून शिवाजीस मुक्त करते. आमच्या प्रतिपक्षास ही गोष्ट संमत होत असेल तर अफझुलखानानें देवीच्या मूर्तीचा भग न करिता देवी आपण होऊन निघून गेली असें आम्हीं क्षणभर कबूल करूं.

अफझुलखानाचा अशा दशा झाल्यावर त्याचा पुत्र फाजल ह्यास उदारबुद्धीनें सोडून दिलें तरी त्यानें विजापुरकराकडे जाऊन माझ्या बापाच्या मरणाबद्दल शिवाजीचा सूड उगवावा असें बादशहास सांगितलें. बादशहानें फाजल खानाबरोबर शिद्दीविलावत नामें सरदार आणि पुष्कळ लष्कर व तोफा देऊन पाठविलें. त्यानीं पन्हाळा किल्ल्यास वेढा घातला. श्री शिवछत्रपति शिवाजी महाराजांनीं स्वधर्माचें पुनरुज्जीवन करून हिंदूपदपादशाहीची प्राणप्रतिष्ठा केली या कार्यास ज्या नरवीरांनीं त्यास सहाय केलें त्यांतील हाजी देशपांडे हें एक रत्न होय. विजापुरकरानीं पन्हाळा (रांगणा) किल्ल्यास वेढा घातला ह्मणून वर सांगितलेंच आहे. शिवाजी महाराजास तेथून निघून विशाळग-

डास जावयाचें होतें परंतु शत्रू तर सारखे पाठलाग करीत होते. अशा स्थितींत हाताखालील लोक केवळ जिवावर उदार झालेलेच असावे लागतात आणि अशा लोकाची शिवाजीजवळ कमताई नव्हती. बाजीदेशपांडे प्रभू नावाचा शूर सरदार ह्या वेळेस रांगणा किल्यावर होता. देशसेवा, स्वराज्य, ह्यांवांचून त्यास दुसरें कांहीं सुचत नव्हतें. शिवाजीनें त्यास रांगणा आणि विशालगड यांमध्यें जी खिंड आहे त्यांत ७०० लोकांनिशीं ठेविलें आणि विशाळगडास जाऊन पोंचल्याच्या खुणेची तोफ होईपर्यंत काहीं झालें तरी शत्रूस पुढें न येऊं देण्याविषयीं बाजी देशपांड्यास आज्ञा केली. शत्रु रांगण्याच्या खिंडीत येऊन ठेपले. शत्रूकडील लोक पुष्कळ होते. शिवाजी महाराज विशाळगडास जाऊन पोंचण्यापूर्वीच ह्या खिंडीतून शत्रूचे लोक निघून जाऊन शिवाजीचा पाठलाग करावा अशी त्यांची उमेद होती. परंतु स्वामी कार्यार्थ आणि देशकार्यार्थ सर्व लोक खर्ची पडून शेवटीं आपलाही देह धारातीर्थी पडला तरी बेहत्तर, पण तोंपर्यंत शत्रूंचा या खिंडींत शिरकाव होऊं द्यावयाचा नाहीं, असा बाजीनें निश्चय केला. बाजीचे सर्व लोक पडले. खुद्द बाजीही घायाळ झाला परंतु अजून खुणेच्या तोफांचा आवाज ऐकूं येईना त्यामुळें बाजीस अत्यंत वाईट वाटलें. परंतु थोडक्याच अवकाशांत महाराज विशाळगडास पोंहचून त्यांनीं तोफेचे आवाज केले ते बाजीनें

ऐकिले. तेव्हां त्यास आपल्या आयुष्याचें सार्थक झालें असें वाटून त्यानें मोठ्या आनंदानें प्राण सोडिला.

बाजी देशपाड्याची ही निःसीम स्वदेशप्रीति आणि स्वामीकार्यदक्षता पाहून कोणत्या आर्यपुत्रास आनंद होणार नाहीं ? इतिहासाची पुनरावृत्ति होते ही म्हण अगदीं खरी आहे. थर्मापिलीच्या महा युद्धात स्पार्टन लोकाचा वीर ' लिओनिडास ' याची आणि बाजी देशपांड्याची सारखी स्थिति झाली. एकास थर्मापिलीच्या घाटांत क्षरसिस्च्या सैन्यास येऊं द्यावयाचें नव्हते, दुसऱ्यास विजापुरकरांच्या लोकाचा शिरकाव विशाळगडचें खिंडींत होऊं द्यावयाचा नव्हता. एकाची देश स्वतंत्र करण्याची प्रबळ इच्छा दुसऱ्याहून यत्किंचित्‌ही कमी नव्हती. लिओनिडाजच्या हाताखालील लोक आपल्या सेनापतीची आज्ञा शिरसा वंद्य करून देशमातेकरिता जितक्या उत्साहानें आणि जिवावर उदार होऊन लढले तेंच आज्ञाधारकत्व, तोच उत्साह, आणि तीच निराशा, बाजी देशपाड्याच्या लोकाच्या आंगीं आली होती. सारांश एका देशात जी ऐतिहासिक गोष्ट घडून आली तिचीच दुसरी सुधारून काढलेली आवृत्ति दुसऱ्या देशांत निघाली. ज्या देशांत अस्सलीं नररत्नें निपजतात तो देश धन्य होय.

पुढें कोंकणात स्वाऱ्या करीत महाराज श्रीरंगपट्टणापर्यंत गेले. एकदर सातशें जहाजें त्यानीं काबीज केलीं.

कोंकण कुडाळ देशांत खेमसावत हा एक बलाढ्य संस्थानिक होता. तो विजापूरकरास मिळाला आणि मला कुमक पाठवून दिल्यास मी शिवाजीवर चालून जातों ह्मणून त्यानें विजापूरच्या दरबारास कळविलें. त्याच्या विनंतीवरून विजापूरकरानीं एका बाजूनें खवासखान ह्यास सावताकडे पाठविलें. दुसऱ्या बाजूनें बाजी घोरपडे खवासखानाच्या मदतीस येत होता. तो कोकणांत येऊन उतरला ही बातमी महाराजास कळताच त्यानीं त्याजवर एकाएकीं छापा घालून त्याचा नाश केला. अशा रीतीनें ह्या प्रसंगीं आपल्या बापाबद्दल बाजी घोरपड्याचा महाराजानीं सूड घेतला. हें वर्तमान ऐकून खवासखान पळून गेला.

शिवाजीच्या अतुल पराक्रमाची हकीकत दिल्लीस जाऊन पोंचली. शिवाजी दिवसेंदिवस बळावत चालला, त्यापासून आपल्या राज्यास पुढें मागें धोका येण्याचा संभव आहे असें औरंगजेबास वाटून त्यानें शास्ताखान नामक नबाबास दक्षिणेंत एक लक्ष फौज बरोबर देऊन रवाना केले. शास्ताखान पुण्यास येऊन शिवाजीच्याच वाड्यांत उतरला होता. पुणें शहरांत शास्ताखानानें ठिकठिकाणीं पहारे ठेविले. ही बातमी शिवाजी महाराजास लागतांच ते कांहीं लोक बरोबर घेऊन, गांवातून एका लग्नाची वरात जात होती तींत सामील होऊन कोणाच्या लक्ष्यात न येता वाड्यांत शिरले. शास्ताखान निजला होता त्या ठिकाणीं जाऊन

त्यावर घार केला. शास्ताखान पळत सुटला, पण तेवढ्या गर्दीत त्याचीं तीन बोटें मात्र तुटलीं. जिवावरचें तीन बोटावरच गेलें अशी समजूत करून घेऊन खानसाहेब सर्व सैन्यासह परत दिल्लीकडे चालते झाले.

सुरत शहर लुटल्यास अगणित द्रव्य प्राप्त होईल अशी बहिरजी जासूदाकडून बातमी लागल्यावर महाराजांनीं सुरत शहर लुटलें. त्या प्रसगीं विपुल लूट मिळाली. सुरतेहून महाराज परत आल्यावर, शहाजी राजे एक दिवस शिकार करीत असतां घोड्यावरून खालीं पडून बेंगरूळ येथें मरण पावले. हें वृत्त ऐकून महाराजास अतिशय दु.ख झालें. मातुश्री जिजाबाईसाहेब तर अग्निप्रवेश करण्यास तयार झाल्या. परंतु आपण असा प्रकार केल्यावर शिवाजीही आपल्या मागोमाग येईल आणि आपण उभारलेली महाराष्ट्र पादशाहीची इमारत आपणच होऊन ढासळून टाकण्याचा आपल्यावर आरोप येईल तो न यावा ह्या उद्देशानें आणि मंत्री लोकांच्या व खुद्द महाराजांच्या विनंतीकडे लक्ष देऊन जिजाबाईसाहेबांनीं आपला विचार रहित केला.

शास्ताखानाच्या झालेल्या त्रेधेची व शिवाजीनें चालविलेल्या लुटालुटीची बातमी औरंगजेबास समजतांच त्याच्या आंगाचा तिळपापड झाला. शिवाजीचें पारिपत्य करण्यास काय युक्ति करावी हें त्यास सुचेना. शेवटीं त्यानें मिरजा राजा जयसिंग नांवें एक बलाढ्य रजपूत सरदार आणि दिलेलखान ह्यांच्या बरोबर पुष्कळ सैन्य

देऊन त्यांना दक्षिणेंत पाठविलें. त्या सैन्याबरोबर सामना करण्याची शिवरायाची तयारी नव्हती. शिवाजीबरोबर तह करावा असें दिलेलखानाच्या मनांत नव्हतें. ह्मणून तो पांच हजार पठाण बरोबर घेऊन पुरंधर किल्यावर चालून गेला. सरदार मुरार बाजी परभू अवघे सातशे निवडक लोक बरोबर घेऊन गडाखालीं दिलेलखानाबरो- बर सामना देण्यास उतरला. मुरार बाजीनें लढण्याची शिकस्त केली. त्याच्या बरोबरचे तीनशे लोक कामास आले. मुरारबाजी लढतां लढतां पडला. त्याचें अलोट धैर्य पाहून खानानें आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. मुरार बाजीचें शिल्लक राहिलेले लोक ग- डावर चालते झाले. दिलेलखानानें लगट करून किल्ल्यास वेढा घातला. हें वर्तमान राजास कळताच ते फार चिंतातुर झाले. जयसिंगाबरोबर त्यांनीं तहाचें बोलणें सुरू केलें. औरंगजेबास बरेच किल्ले देऊन आ- पण दिल्लीस त्याच्या भेटीस येतो असें महाराजांनीं जय- सिंगास कळविलें. त्यावर जयसिंगानें वेढा उठविण्याची दलेलखानास आज्ञा केली. औरंगजेब कांहीं दगा करील ह्मणून जयसिंग शिवाजीबरोबर गेला नाहीं. बरोबर कांहीं विश्वासू लोक घेऊन शिवाजी दिल्लीस गेला. तेथें दरबारांत शिवाजी महाराजांचा कांहीं अपमान करण्यांत आला. महाराजांस फार संताप चढला. हें पाहून औरंगजेब-फार भ्याला व त्यानें शिवाजीस नजर कैदेंत ठेविलें. आपणास बादशहानें दिल्लीस आणून फसविलें,

आतां ह्या संकटांतून परत दक्षिणेकडे कसें निघून जातां येईल, अशी महाराजांस चिंता पडली. मोठमोठाल्या सरदार लोकांकडे मेवामिठाईचे नजराणे पाठविण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. असें कांहीं दिवस चालल्यावर एके दिवशीं पाच सहा मोठे पेटारे तयार करवून पुढील आणि मागील एक दोन पेटारे मिठाईनें भरले. मधल्या दोन पेटाऱ्यांत आपण आणि पुत्र संभाजी, ज्यास महाराजांनीं आपल्याबरोबर आणले होते, असे दोघे बसले. आपल्या पलंगावर हिरोजी फर्जंद यास निजविलें. त्याचा फक्त एक हात उघडा ठेविला होता. ठरल्याप्रमाणें पेटारे उचलणारांनीं पेटारे गांवाच्या बाहेर आणून ठेविले. तेथें बाहेर निघून पितापुत्र घोड्यावर बसून चालते झाले

इकडे शिवाजी अजून का उठत नाहीं, ह्मणून चौकीवाल्यांनीं शोध करितां महाराजांची प्रकृति आज चांगली नाहीं, असें लोक सांगू लागले. कांहीं वेळानें हिरोजी फर्जंद उठून बाहेर आला आणि त्यानें पहारेकऱ्यांस सांगितलें कीं, महाराजाची प्रकृति आज चांगली नाहीं, म्हणून ते अजून निजले आहेत, कोणास आंत जाऊं देऊं नका. मी आता बाजारांतून जाऊन येतों असें म्हणून गेला तो गेलाच. बराच वेळ पहारेकऱ्यांनीं वाट पाहिली पण हिरोजी परत येईना, आणि आंतही कांहीं चाहूल लागेना. तेव्हा त्यांनीं चौकशी करितां महाराज वगैरे आत कोणी नाहीं, असें त्यांस आढळून आलें. पुढें ही बातमी औरंगजेबास कळल्यावर त्यानें

तोंडांत बोट घालतें. चोहोंकडे सैन्य शिवाजीच्या तपासास पाठविलें. परंतु शिवाजी महाराज हातीं लागले नाहींत.

दिल्लीहून शिवाजी महाराज संभाजीसह निघाले ते मथुरेस आले. तेथें दक्षिणेंतील कोणी ओळखीचा आहे कीं काय असा तपास करितां, कृष्णाजीपंत, काशीपंत, व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधु मोरोपंत पेशव्यांचे मेहुणे होते, त्यांच्या घरीं महाराज उतरले. त्यांना सर्व हकीकत सांगून, संभाजीस आपल्या बरोबर नेणें सुरक्षित नाहीं असें जाणून त्यास त्यांच्या घरीं ठेवण्याचें ठरविलें, आणि आपण कृष्णाजीपंतास बरोबर घेऊन प्रयाग, गया वगैरे ठिकाणीं जाऊन तेथून गोंडवण, भागानगर, विजापूर, अशा मुद्दाम वाकड्या रस्त्यानें जाऊन रायगडीं आले. महाराजांचें आगमन झाल्यावर सर्वांस आनंदातिरेक होऊन जिकडे तिकडे उत्सव सुरू झाले. प्रत्येकानें आपआपल्यापरी जसा आनंद प्रदर्शित करावयाचा तसा केला.

इकडे संभाजीस मथुरेस ठेविलें होतें म्हणून आतांच सांगितलें. औरंगजेबाच्या लोकास ही गुणगुण लागून ते तपासास त्या बंधुत्रयाच्या येथें आले. विसाजीपंत आणि काशीपंत ह्यांनीं सांगितलें कीं, संभाजी येथें असावयाचा मुळींच संभव नाहीं. तुम्हीं म्हणता तो संभाजी नसून आमचा मुलगा आहे. परंतु औरंगजेबाच्या लोकांची खात्री होईना. शेवटीं त्यांनीं सांगितलें कीं, जर तुम्हीं आणि हा मुलगा एका ताटांत जेवाल तर आम्हांस खरें

वाटेल. विसाजीपंत आणि काशीपंत यांनीं कांहीं आढे-वेढे न घेता संभाजी बरोबर एका ताटात भोजन केले. पादशहाच्या लोकाचा संशय नाहींसा होऊन ते निघून गेले. पुढें कांहीं दिवसांनीं संभाजी आणि हे बंधू हे शिवाजीकडे गेले. महाराजानीं त्यांना 'विश्वासराव' ही पदवी देऊन मोठमोठालीं कामें सांगितलीं.

ह्या एका गोष्टीवरून ब्राम्हणांच्या नांवानें खडे फोडणारानीं हें लक्षांत घ्यावयास पाहिजे कीं, सतराव्या आणि अठराव्या शतकांत जेव्हां जेव्हा स्वामिकार्य करण्याचा प्रसंग आला तेव्हां तेव्हां ब्राम्हण आपल्या सर्व अडचणी एकीकडे ठेवीत असत. सर्व धर्मबंधनें झुगारून देत असत. इतकेंच नव्हे तर, जेव्हां जेव्हा गृहस्थाश्रम बाजूस ठेवून क्षात्रधर्म स्वीकारण्याचा प्रसंग आला तेव्हा तेव्हा तितक्या पुरती हातात तरवार घेऊन अटकेपर्यंत मराठ्यांचे नाव गाजविण्यास त्यांनीं कधीं केलें नाहीं. स्वामिसेवा करण्यास त्यांचा धर्म त्यास कधींही आड आला नाहीं. असो.

## शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था.

दिल्लीहून परत आल्यावर १६६८ आणि १६६९ हीं दोन वर्षे महाराजानीं राज्यव्यवस्था करण्यांत घालविलीं.

शिवाजी महाराजांचें मुख्य सैन्य पायदळ होय. हें पायदळ घांटमाथा आणि कोंकण या दोन ठिकाणीं होतें.

घाटमाथ्यावरील सैन्यास मावळे असें ह्मणत. कोंकणांतील पायदळ हेटकरी या नांवानें प्रसिद्ध होतें. त्याचा पोषाक अगदीं साधा आणि थोड्या खर्चाचा होता. ढालें, तरवार, आणि तोड्याची बंदूक, हीं त्यांचीं मुख्य शस्त्रें होतीं. हेटकरी लोक नेम मारण्यात पटाईत होते, परंतु मावळ्यासारखे अवघड किल्ले पटापट चढण्याचें काम त्यांस उरकत नसे.

दहा दहा लोकांवर एक मुख्य अधिकारी असे त्याला नाईक असें ह्मणत. पन्नास लोकांच्या टोळीवरील मुख्यास हवलदार ही संज्ञा होती. शंभर लोकांवर अधिकार चालविणाऱ्या कामगारास जुमलेदार आणि हजार लोकांचे नायकास एक हजारी असे किताब होते. ह्या शिवाय पाच हजार सैन्यावरील सेनापतीस पंचहजारी ह्मणत. मुख्य सेनापतीस सरनोबत ही पदवी असे.

घोडेस्वाराचे बारगीर आणि शिलेदार असे दोन प्रकार होते. बारगीर हे सरकारचेच कायम नोकर असत. शिलेदार मक्त्यानें घोडे वगैरे पुरवून रहात असत. शिवाजीच्या जवळ जे घोडेस्वार होते त्यांतील कांहीं लोक तो बारगीर मंडळींत ठेवी व कांहींचा समावेश शिलेदार मंडळींत करी. ह्या योगानें कोणीही उद्दाम रीतीनें वर्तन केल्यास त्यास कळून येत असे. हे लोक बातमी आणण्याच्या कामीं अतिशय उपयोगी पडत.

घोडेस्वाराजवळ ढाल तरवार असे. मधून मधून

कित्येकांजवळ तोड्याच्या बंदुका असत. परंतु त्यांचें मुख्य हत्यार भाला होय, आणि त्याचा उपयोग ते मोठ्या कुशलतेनें करीत.

पंचवीस घोडेस्वारावर देखरेख करण्यास एक हवलदार असे. सवाशे घोडेस्वाराच्या मुख्यास जुमलेदार ह्मणत. आणि अशा पाच जुमल्याच्या नायकास सुभेदार ह्मणत. प्रत्येक सुभ्यावर एक हिशोबी कारकून आणि खजिनदार असे. तो बहुतकरून ब्राह्मण अगर परभू असे. दहा सुभ्यावरील अंमलदारास पंचहजारी असा किताब होता. त्याच्या हाताखालीं हिशोबासाठीं एक ब्राम्हण मुजुमदार असे, आणि परभू अर्मीन असे. सर्व घोडेस्वारांवरील सेनापतीस सरनोबत असें ह्मणत.

मावळे लोक कधीं कधीं नुसत्या धान्यावर चाकरीस रहात असत. परंतु पायदळाचा नियमित पगार चार रुपयापासून बारा रुपयापर्यंत होता. बारगिरांना आठापासून विसापर्यंत वेतन मिळे. आणि शिलेदाराची दरमहाची मिळकत चोवीस पासून अठ्ठेचाळीस रुपयापर्यंत असे. लढाईंत अगर स्वारींत मिळविलेल्या सर्व लुटीवर सरकारचा हक्क असे. काहीं ठराविक प्रसंगीं दरबारात अगर एखाद्या सार्वजनिक ठिकाणीं प्रत्येकजण आपण मिळविलेली लूट राजास नजर करी. सरकारांतून कांहीं भाग त्यास परत मिळत असे.

गोमाता, शेतकरी, आणि स्त्रिया, यांना लुटीच्या प्र-

संगीं कोणीही केव्हांही कांहीं इतका त्रास देऊं नये अ-
शी महाराजांची सक्त आज्ञा होती. तसेंच एखादा
श्रीमंत खंडणी देत असल्यास त्यांस सोडून देत असत.
कोणत्याही शिपायास लढाईवर जातांना बरोबर बायको
घेण्याची मनाई होती, आणि या हुकुमास तो चुकला तर
त्यास मृत्यूची शिक्षा होत असे.

शिवाजी महाराजांचे वेळेस तारायंत्रानें बातमी मिळून त्यावर राज्यकारभाराचीं सूत्रें चालविण्याचें साधन नव्हतें. तरी कोठें काय चाललें आहे ही बातमी काढण्याची शिवाजीनें उत्तम प्रकारची तजवीज केली होती. त्यामुळें कोणास आपल्या अधिकाराचा दुरुपयोग अगर कांहीं लबाडी करिता येत नसे. कदाचित् कोणी तसें वर्तन केल्यास त्यास कडक शिक्षा मिळत असे. ज्या लोकांनीं लढ.ईत उत्तम नौकरी बजावली असेल त्यास बढती मि. ळत असे. जखमी झालेल्यास मान मिळून त्याचें नुकसान पैशाच्या अगर बक्षिसाच्या रूपानें भरून देण्यात येई. लष्करी लोकास जहागीर देणें शिवाजीस अगदीं पसंत नव्हतें. आणि दूरवर विचार केला असतां हें त्याचें मत बरोबर होतें. आमच्या इंग्रज सरकारचें तरी धोरण बहुधा हेंच असतें ही गोष्ट वाचकांस विदित आहेच.

वरिष्ठाची आज्ञा हाताखालच्या लोकास वेळच्या वेळीं पाळावी लागत असे. ही व्यवस्था किल्ल्यामधून जास्त अमलांत येई. प्रत्येक दुर्गपतीस हवालदार ह्मणत.

त्याच्या हाताखालीं एक दोन सरनोबत असत. पुरंदर, राजगड, पन्हाळा, वगैरे मोठमोठ्या किल्ल्यावर अधिक सरनोबत असत. प्रत्येक किल्ल्यावर एक कारकून आणि एक कारखाननीस असे. कारकुनास सबनीस ह्मणत व ते काम बहुतकरून ब्राह्मणाकडे असे. कारखाननीस परभू असे. आत येण्यास व बाहेर जाण्यास हुकूम लागे. गस्त, पहारे वेळच्यावेळीं होत असत. पाणी, धान्य, दारुगोळा, ह्याचा पुरवठा मोठ्या व्यवस्थेशीर रीतीनें होई. काटकसरीनें खर्च करून उत्तम रीतीची राज्यव्यवस्था ठेवण्यांत शिवाजी महाराजाचा हातखंड असे.

दादोजी कोंडदेवानें घालून दिलेल्या पद्धतींतच थोडा फार फेरफार करून शिवाजीनें ती पद्धती पुढें चालविली. शेतांत पीक उभें असेल त्यावर सारा बसविण्यांत येई. एकदर पिकापैकीं तीन भाग रयतेचे आणि दोन भाग सरकारचे असें ठरविलें. एखादा नवीन प्रांत मिळाला कीं शिवाजी महाराज मक्तेयानें वसूल करण्याची तेथें चाल असल्यास ती बंद करीत. सरकारचा सारा सरकारनें नेमलेल्या कामगाराकडून येत असे.

प्रांताचे लहान लहान भाग करून त्यांवर मामलेदार तालुकदार, सुभेदार, आणि हवलदार हे कामगार असत. देशमूख देशपांड्यांस देशाच्या राज्यव्यवस्थेंत पडतां येत नसे, अगर त्यांचे इनाम नक्की ठरल्याशिवाय त्यांस मिळत

नसे. लष्करी अगर मुलकी खात्यांतील लोकांस निर-निराळें वेतन मिळे. त्यांच्या पगारासाठीं कांहीं खेडया-चा नियमित भाग तोडून देणें हें शिवाजीस अगदीं पसंत नव्हतें, कारण एकदा अशी पद्धती सुरु केली म्ह-णजे ते लोक आपल्या फायद्यासाठीं रयतेवर हवातसा जुलूम करून वसूल जमा करतील, आणि कांहीं दिवसां-नीं तेवढा प्रांतही कदाचित् बळकावून बसतील, असें महाराजांचें म्हणणें असे.

देवस्थानें आणि त्यांचीं उत्पन्नें महाराजानीं काळजी-पूर्वक चालविलीं. त्यावरील पुजाऱ्यास त्या उत्पन्नाच्या खर्चाचा हिशोब द्यावा लागत असे. श्री छत्रपतींनीं मु सलमानी अमलांत ज्या पिरास, मशिदीस, अगर अवलि-याच्या स्मारकास सरकारांतून वर्षासनें असत तीं कधींही बंद केलीं नाहींत.

दिवाणी कामासंबंधानें न्याय करण्याचें काम पंचांच्या मार्फत होत असे. लष्करी लोकाचे तंटयांचा त्याचे वरिष्ठ अधिकारी फैसला करीत. फौजदारी गुन्ह्याची चौकशी करण्यासाठीं धर्मशास्त्राच्या आधारानें कायदे केले होते.

एकदर राज्यव्यवस्था सुरक्षित चालण्यासाठीं अष्टप्रधा न् नेमले होते. पेशवे, मुजुमदार, सुरनीस, वाकनीस सरनोबत, दबीर, न्यायाधीश आणि न्यायशास्त्री. सन १६७४ त राज्याभिषेक झाल्यावर ह्या अष्टप्रधानाची मूळ

मुसलमानी नांवें बदलून त्यांस संस्कृत नांवें देण्यांत आलीं.

ह्या सर्व व्यवस्थेवरून पहातां सतराव्या शतकांतील राज्यपद्धती निदान ती ज्या तत्वांवर रचली होती तीं तत्वें सुधारलेल्या एकोणिसाव्या शतकांतील तत्वाहून भिन्न होतीं असें दिसत नाहीं. आतां त्या वेळेस ती व्यवस्था कदाचित चांगल्या रीतीनें अमलात आणतां आली नसेल; यांत शिवाजी महाराजांचा दोष नव्हे, कारण तो काल शांततेचा नव्हता. महाराज राजे होते, पण त्यांस राजवैभव भोगण्यास स्वास्थ्याचे दिवसच मिळाले नाहींत. असो.

अशाप्रकारें आपल्या राज्याची व्यवस्था लावल्यावर दिल्लीच्या बादशहास दिलेले किल्ले परत घेण्याच्या उद्योगास ते लागले. त्यांतील कोंडाणा किल्ल्याची हकीकत विशेष ध्यानात ठेवण्याजोगी आहे, म्हणून ती येथें नमूद करितों. तानाजी मालसुऱ्यानें कोंडाणा किल्ला मी घेतों असें कबूल केलें. पांचशे लोकांनिशीं तो कोंडाणा किल्ल्याच्या पायथ्याशीं आला. किल्ल्यावर मोंगलांचा उदेभान रजपूत म्हणून एक बलाढ्य सरदार होता. रात्रीच्या वेळीं आपल्या बरोबर कांहीं निवडक लोक घेऊन शत्रूस चाहूल लागूं न देतां तानाजी गडावर चढला. नंतर शत्रूस चाहूल लागली. दोन्ही पक्षांचें पुष्कळ वेळ युद्ध होऊन शेवटीं तानाजी आणि उदेभान यांचीं समोरा

समोर गांठ पडली. युद्धात दोघेही पडले. तानाजीचा भाऊ सूर्याजी यानें उरलेले रजपूत मारून गड फत्ते केला. शिवाजीस ही हकीकत समजल्यावर त्यास वाईट वाटून तो दुःखानें म्हणाला ' गड आला पण सिंह गेला'. कोंढणा किल्ल्याचें नाव तेव्हांपासून सिंहगड असें पडलें. महाराजांनीं सूर्याजीस तानाजीची जागा दिली. श्री छत्रपती महाराजास जी सहायकारी मंडळी मिळाली होती ती सर्व अशीच होती. तानाजी मालुसरे, बाजी फसलकर, येसाजी कंक, बाजी देशपांडे, हिरोजी फर्जंद, वगैरे सर्व सारखे जिवास जीव देणारे असे होते. स्वधर्मरक्षणासाठीं हातांत शीर घेऊन लढणारे त्यावेळचे तानाजी, बाजी, येसाजी, वगैरे मावळे, खांद्यावर तांदळाच्या पिशव्या भरून आणून 'तांदुळ घ्या तांदूळ' असें म्हणत आज पुण्यांत पेठोपेठानी फिरणाऱ्या मावळ्याचेच पूर्वज होते, ही गोष्ट लक्षात आली म्हणजे आम्हांस आलेल्या हीन स्थितीचें चित्र हुबेहुब डोळ्यापुढें उभें राहतें.

नंतर शिवाजीनें आपला मोर्चा पुन्हा सुरतेकडे फिरविला. सुरतशहर लुटून बरीच संपत्ति आणिली. ही बातमी ऐकून मोंगलाची फौज वणी दिंडोरी येथें आली. मोंगलाचे सरदार मोबतखान आणि दाऊदखान याच्याशीं युद्ध झालें. प्रतापराव गुजर आणि इतर सरदार यानीं मोठा पराक्रम केला. मोगलाचा बीमोड झाला. महाराज सुरतेहून कोंकणच्या वाटेनें परत आले. वाटेंत कोंकणा-

तील काहीं ठिकाणें घेतलीं. प्रतापराव गुजरास खानदेशांत जाण्यास सांगितलें. खानदेशांतील प्रत्येक पाटील कुळकर्ण्यांपासून, सरकारी वसुलां पैकीं चवथाई शिवाजीस देत जाऊं, असे करार लिहून घेतले व त्यांस आलेल्या चवथाई बद्दल पावत्या देऊन, दर वर्षीं असें केल्यास लुटीचें भय तुम्हांस नाहीं इतकेंच नव्हे तर तुमचे आम्हीं सरंक्षण करीत जाऊं, असेंही प्रतापरावानें त्यांस सांगितलें.

विजापूरकरांचा किल्ला रायरी हा सर करून त्याचें नाव रायगड ठेवलें. आणि एकंदर स्थिती मनांत आणून सिंहासनास हाच किल्ला योग्य असें महाराजांनीं ठरविलें. त्याप्रमाणें तेथें वाडे, महाल, आणि कारखाने बांधले. ह्याच सुमारास म्हणजे शके १५९२ चैत्र शु० ९ स मोहित्याची कन्या सोयराबाई शिवाजीची दुसरी बायको ही पुत्र प्रसवली. तो पालथा झाला. ह्यावरून हा मोंगलशाही पालथी घालील असें महाराज बोलले. त्याचें नाव राजाराम ठेविलें.

शिवाजीचा दिवसेंदिवस होत असलेला उत्कर्ष म्हणजे आपल्या राज्याचा अपकर्ष असें औरंगजेबास वाटूं लागलें. शिवाजीचे एकएक पराक्रम ऐकून, आज सुरत लुटली तर उद्यां औरंगाबाद सर केलें, तिसऱ्या दिवशीं सांवताच्या वाडीकडे स्वारी करून त्यास जेर केलें, अशा खबरा ऐकून औरंगजेब अधिकच चिंतातूर झाला.

आपण स्वतः जावें तर न जाणों कदाचित् प्राणास मुकूं, यासाठीं दुसरा कोणी सरदारच शिवाजीवर पाठविण्याचा त्यानें निश्चय केला. दिलेलखान, इखलासखान, आणि बेलोलखान, यांस चाळीस हजार सैन्य देऊन रवाना केलें. त्यापैकीं निमी फौज दिलेलखानाच्या हाताखालीं देऊन त्यांनें चाकणवर हल्ला केला आणि बाकी राहिलेल्या वीस हजार फौजेवर इखलासखान यास सेनापति नेमून त्यास सालेरीकडे पाठविलें.

चाकणाहून दिलेलखान खळाजवळ्यास आला. रामाजी पांगेरा म्हणून एक हजारी होता, त्याची आणि दिलेलखानाची कणेरा गडाखालीं गांठ पडली. ह्यावेळीं रामाजी पांगेरा फारच चांगल्या रीतीनें लढला. वीस हजार फौजेबरोबर पांगेऱ्याचे सातशे लोकच मोठ्या निकरानें लढले. प्रत्येकास पंचवीस तीस जखमा लागल्या. मराठ्यांचा हा पराक्रम पाहून दिलेलखान चकित झाला.

इकडे इखलासखान सालेरीकडे आला म्हणून नुकतेंच सांगितलें. त्यानें सालेरीस वेढा घातला. हें महाराजास कळताच त्यांनीं प्रतापराव गुजरास पत्र लिहिलें कीं, " तुम्हीं लष्कर घेऊन शिताफीनें वरघाट सालेरीस जाऊन बेलोलखानावर छापा घालून बेलोलखान मारून चालविणें आणि कोंकणांतून मोरोपंत पेशवे यांस हशमानिशीं रवाना केलें. हे इकडून येतील आणि तुम्हीं वर

घांटी कोंकणांतून येणें असें दुतर्फा चालून घेऊन गनी-मास माघून गर्दीस मिळविणें. "

ह्या पत्रावरून महाराजांचा दूर विचार, मुत्सद्दीपणा, आणि शत्रूस पेंचात धरण्याची युक्ति, ह्या सर्व गोष्टी दिसून येतात. आज्ञेप्रमाणें तिकडून प्रतापराव आले, इकडून पेशवे गेले. शिवाजीच्या सैन्याचा आणि विजापुरकरांच्या अथवा औरंगजेबाच्या सैन्याचा सामना फारच क्वचित् प्रसंगीं होत असे अथवा साल्हेरी मुक्कामीं जो सामना झाला तो पहिलाच होय असें म्हटल्यास हरकत नाहीं. मराठ्यांची युद्धपद्धती पहिल्यापासून निराळी तर खरीच. शत्रूची व त्याची प्रत्यक्ष समोरासमोर गांठ पडत नसे आणि त्या वेळेस शिवाजीचे सैन्यास जें पाठबळ होतें, त्याची संख्या पाहतां हीच युद्धपद्धती स्वीकारणें हेंच मुत्सद्दीपणाचें काम होतें, तथापि साल्हेरीच्या रणांगणात जो युद्धप्रसंग झाला त्यावरून मोंगलांच्या सरदारास आणि कोसच्या कोस पसरणाऱ्या सैन्यास मूठभर मावळे भारी होते, हें सिद्ध होतें.

साल्हेरीच्या वेढ्यांत मोरोपंत पेशव्यांच्या हाताखालीं मावळे होते. व प्रतापराव गुजराजवळ घोडेस्वार होते. दोघांनीं दोहों बाजूंनीं हल्ले केले. युद्ध सारखें चार प्रहर होऊन मोंगल अगदीं जेरीस आले. शिवाजीस अत्यंत लूट सांपडली. त्यानें बावीस नामांकित मोंगल सरदारांस कैद केलें. परंतु नोकरच सोडलें. ह्या लढाईंत

मराठ्यांकडील पुष्कळ सरदारांनीं पराक्रम गाजविला. पण त्यांत विशेषतः मोरोपंत पिंगळे, प्रतापराव गुजर, आणि सूर्यराव काकडे, यांनीं विशेष नांव राखिलें. सूर्यराव काकडे मात्र पडला. हा पांच हजारी सरदार होता. हा शिवाजीच्या लहानपणच्या मित्रमंडळींपैकीं असून जावळी आणि रोहिला हे किल्ले घेतांना ह्यानें फार मोठी कामगिरी बजावली होती. दिलेलखान सालेरीहून चार मजलींवर होता. त्यानें ही बातमी ऐकून पळ काढला.

औरंगजेबास सालेरीच्या वेढयाची हकीकत समजल्यावर तो अत्यंत कष्टी झाला. मुसलमानी राज्य नाहींसें होऊन मराठी साम्राज्य व्हावें असा ईश्वरी संकेतच दिसतो असें त्यासही वाटूं लागलें. तथापि शिवाजीस पायबंद घालण्यासाठीं त्याच्या खटपटींत कमतरता नव्हती. मोहबतखान यास परत बोलावून खानजान बहादूर यास दक्षिणेचा सुभेदार नेमलें.

इकडे विजापूरकराचा सुलतान फार वयातीत होऊन त्यास अर्धांग वायु झाला. त्याचा मुलगा शिकंदर हा केवळ पांच वर्षांचा होता. त्यामुळें सुलतानानें राज्यकारभार चालण्यासाठीं खोवासखान, अबदुलकरीम, आणि मुजफिरखान ह्या तिघांस कारभारी नेमलें. त्यांच्यामध्यें आपसांत भांडणें लागलीं. अशी संधी पाहून शिवाजीनें अण्णाजीदत्तो ह्यास पाठवून पन्हाळा किल्ला

घेतविला आणि इतरही किल्ले काबीज केले. पन्हाळा किल्ला परत घेण्यासाठीं अबदुलकरीम बारा हजार स्वारानिशी चालून आला. त्यास मागें हटविण्याकरिता शिवाजीनें प्रतापराव गुजराची योजना केली. त्यानें नबाबास कोंडून अगदीं जेर केलें. शेवटीं त्यानें प्रतापरावाशीं तह केला. शिवाजीच्या मनात तह करण्याचें मुळींच नव्हतें. त्यामुळें प्रतापरावाची ही वर्तणूक त्यास अगदीं पसंत पडली नाहीं. इतकेंच नव्हें तर अबदुल करीमाचा नाश केल्या शिवाय तुम्हीं मला तोंड दाखवूं नका असा महाराजानीं त्यास निरोप पाठविला. आपण केलेली आज्ञा अमलात आणण्यास कोणी कसूर केल्यास, मग तो प्रतापरावासारखा मोठ्या हुद्याचा मनुष्य असला तरी, त्याची कानउघडणी करणें हें आपलें काम आहे असें शिवाजी समजत असे, आणि त्याप्रमाणें वागेही. तो जितका दयाळू होता तितकाच कडकही होता. नायक होण्यास असेच गुण अंगीं असावे लागतात. शिवाय हेंही लक्षात ठेविलें पाहिजे कीं तो काल असा काहीं चमत्कारिक होता, कीं महाराजानीं थोडी कानउघाडणी केल्यावर, हाताखालील सरदार याबद्दल विषाद न मानितां आपण अधिक पराक्रम करून दाखवून महाराजांस संतुष्ट करूं, अशी त्याच्यांत नेहमीं महत्वाकांक्षा असे. प्रतापराव गुजर अशा मंडळीस अपवाद नव्हता. उत्तम

प्रकारची कामगिरी बजाविण्याची संधी केव्हां येते हें तो पहात होता.

१६७४ च्या मार्च महिन्यांत अबदुल करीमानें जय्यत तयारी करून पन्हाळ्याकडे कूच केलें. इतक्यात प्रतापरावही तेथें येऊन ठेपला. दोघांची गांठ जेसरी येथें झाली. महाराजांची इतराजी झाल्यामुळें प्रतापरावास अधिकच चेव येऊन त्यानें मराठ्यांची नेहमींची युद्धपद्धति सोडून देऊन अबदुल करीमाच्या सैन्यावर एकदम जिवावर उदार होऊन हल्ला केला. प्रतापरावाच्या पुष्कळ लोकांचा नाश होऊन शेवटीं स्वतः प्रतापरावही पडले. विजापूरकरांचा जय झाला, आणि ते मोठ्या आनंदांत होते. इतक्यांत मराठ्याकडील हंसाजी मोहिते पंचहजारी हा रिकामा होता; त्यानें प्रतापरावाचा पराभव झाला आहे, आणि मुसलमान लोक चैन करीत आहेत, हें पाहून आपल्या लोकांस धीर देऊन मुसलमानावर त्याच संधीस एकदम हल्ला केला. मराठ्यांस काय अगर इतरांस काय, नायक चांगला लागतो; मग त्याच्या मागून येणाऱ्या लोकांची उणीव पडत नाहीं. प्रतापराव शूर खराच, पण तो दुर्दैवानें ह्या वेळेस पडला. हंसाजी मोहित्यांनीं आपला मराठी बाणा ह्या वेळेस राखला नसता तर पन्हाळा विजापूरकरांच्या हातीं खास गेला असता. परंतु हंसाजी पुढें होतांच जे लोक

आपला सेनापति पडला ह्मणून रणांतून पाय काढाव-यास लागले होते त्यांच्या आंगांत वीरश्री उत्पन्न झाली, आणि विजयश्रीनें चुकून अब्दुल करीमास जी माळ घातली होती ती हंसाजी मोहित्यास घातली. जेते होते ते जित झाले. शिवाजी महाराजास हें समजल्यावर त्यानीं हंसाजीस हंबीरराव मोहिते अशी पदवी देऊन प्रतापरावाच्या अकालीं मरणानें रिकामी झालेली जागा त्यास दिली. प्रतापरावास महाराज दोन कडू शब्द बो-लले होते तरी त्याची ( प्रतापरावाची ) योग्यता ते ओळखून होते. त्याच्या कुटुंबाची आणि नातलगाची महाराजानीं चांगली व्यवस्था लाविली, इतकेंच नव्हें तर पुढें काहीं दिवसानीं योग्य प्रसंग आल्यावर प्रतापरावा-च्या मुलीचें राजारामाशीं लग्न लाविलें.

शिवाजी महाराज १६६४ पासूनच आपल्या नावा-चीं नाणीं पाडूं लागले होते. राजा हें पद त्यानीं धार-ण केलें होतें. तथापि, विधिपूर्वक राज्याभिषेक त्यास अजून झाला नव्हता. १६४९ सालीं तोरणा किल्ला घेऊन मराठी राज्याचें तोरण त्यानीं बांधून ठेविलें. पुढ-चें सर्व शुभ कार्य उरकून घेण्यास कालावधि पाहिजे हो-ता. १६४९ पासून १६७४ पर्यंत महाराजानीं अ-नेक पराक्रम करून दोही बाजूच्या यवनशाहीस पादा-क्रांत करून सोडिलें. खानदेशापासून तों तुंगभद्रप-र्यंतचा मुलूख मराठ्यांचा बनला; राज्यव्यवस्थेचें काम

सुरळीत चालू लागलें. प्रत्येक खात्यात योग्य माणसां-ची निवड करून ते आपआपल्या कामांत निपुण आहेत असें पाहून आता आपल्या स्वत:स राज्याभिषेक करून घेण्यास काहीं हरकत नाहीं, असें महाराजास वाटलें. त्या प्रमाणें सर्व मंत्री मंडळाचा सल्ला घेऊन काशीहून वेद-शास्त्र संपन्न रा. गागाभट्ट यास आणून त्यांच्या हातून हा मंगळ विधि करण्याचा महाराजानीं निश्चय केला. गागाभट्टा-नीं महाराजाचें जन्म उत्तम कुळात झालें आहे हें पाहून राज्याध्या ह्मणण्यास आपली संमति दिली. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध १२ स राज्यारोहण समारंभ रायगडावर झाला. महाराजांनीं आपली सुवर्ण तुला करून तें द्रव्य ब्राह्मणास वाटिलें. वे० स० रा० गागाभट्टजींची उत्तम प्रकारें संभावना केली. राज्यकारभार करण्यास आजपर्यंत जे कारभारी होते त्यांच्या पदव्या मुसलमानी भाषेंत होत्या त्या मोडून अष्ट-प्रधानास निरनिराळे किताब दिले ते येणेंप्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| १ | मोरोपंत पिंगळे | मुख्य प्रधान. |
| २ | रामचंद्रपंत निळकंठ | अमात्य. |
| ३ | अण्णाजी दत्तो | सचिव. |
| ४ | दत्ताजीपंत | मंत्री. |
| ५ | हबीरराव मोहिते | सेनापति. |
| ६ | त्रिंबक सोनदेव | सुमंत. |
| ७ | निराजी रावजी | न्यायाधीश. |

## ८ रघुनाथपंत पंडितराव.

शिवाजी महाराजांची ह्याच्या पुढील मोठी कामगिरी कर्नाटकांतील स्वारी होय. शहाजी महाराजांनीं कर्नाटकांत जी जहागीर मिळविली होती तिची व्यवस्था शिवाजी महाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजी ह्याच्याकडे दिली होती. शहाजीच्या मागें त्याचे कारभारी नारो दीक्षित याचे चिरंजीव रघुनाथ नारायण हे काम पाहूं लागले. हा गृहस्थ फार कुशाग्र बुद्धीचा असून थोरही होता. परंतु व्यंकोजी राजाचें आणि त्याचें पटेना, तेव्हां तो शिवाजी महाराजांकडे आला. त्यांनीं त्याचा उत्तम सन्मान करून त्यास मोठ्या हुद्याची जागा दिली. महाराजांनीं कर्नाटकांत स्वारी करण्याचा बेत केला. परंतु त्यास कांहीं तरी कारण पाहिजे होतें, म्हणून व्यंकोजी राजे यांच्याजवळ आमची वडिलोपार्जित जहागीर आहे, आणि हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें त्या जहागिरीचा निमा मालक मी आहे, तो निमे वाटा घेण्यासाठीं कर्नाटकाकडे आपण कूच करितों, असें महाराजांनीं बाह्य कारण दाखविलें. अंतस्थ हेतु आपल्या वडिलोपार्जित जहागिरीखेरीज आणखी मुलूख काबीज करण्याचा होता. रघुनाथ नारायण ह्यास कर्नाटकाची चांगली माहिती होती म्हणून त्यास बरोबर घेतलें.

ह्या स्वारींत द्रव्याची जरूर फार होती म्हणून भागनगरच्या (हैद्राबाद) पादशहाशीं तह करण्याचा महारा-

जांबीं वांट घातला. त्या वेळेस हैद्राबादेस प्रख्यात मु-त्सद्दी मादण्णा आणि अकण्णा यांच्याकडे तेथील कारभा-र होता. आपण येत अहों असें न्यायाधिशाचा मुल-गा प्रल्हादपंत याचे बरोबर सांगून पाठविलें. त्या राज्यांतील प्रजेचे एका काडीसही धक्का लावूं नये असा महाराजांचा आपल्या सैन्यास सक्त हुकूम होता. महाराज आपल्या भेटीस येतात परंतु ह्याच्या मनांत कांहीं कपट आहे किंवा काय अशी पातशहास शंका आली. प्र-ल्हादपंतांनीं आणाशपथा वाहून पातशहाच्या मनातील भय नाहींसें केलें. महाराजास मादण्णापंत सामोरे गेले होते. नंतर पादशहाची भेट झाल्यावर पादशहा फार खुष झाला. दोघाचे तह होऊन शिवाजीस पुष्कळ द्रव्य मिळाले. हैद्राबादकर शिवाजी महाराजास करभार देत असत, आणि अशा नात्यानें महाराजाचे ते आता मांडलिक राजे बनले होते. त्यात महाराजानीं आता तह करून अधिक सख्य वाढविलें. पातशहाचे कांही सैन्य आपल्या मदतीस घेऊन महाराज कर्नाटकाकडे नि-घाले. वाटेनें श्री मलकार्जुनाचें दर्शनाचा लाभ झाला. तेव्हां महाराजांस फार विरक्ती उत्पन्न होऊन श्रीचरणीं आपला देह अर्पण करावा अशी इच्छा झाली परंतु र. पुनाथरावाच्या उपदेशानें तें वैराग्य नाहींसें हो[illegible] महा-राज आपल्या कर्तव्यास [illegible] चंदीस वेढा घालून ती सर केली. नंतर व्यंकोजीराजे यांची आणि महारा-

ांची भेट झाली. वडिलोपार्जित विरुदें घेण्यासाठीं आम्हीं आलों आहों असें महाराज म्हणाले, तेव्हा कदाचित जबरदस्तीनें विरुदें घेतील असें व्यंकोजी राजांच्या कारकून मंडळीनीं त्याच्या मनांत भय घालून त्यास तेथून पळविलें. ही बातमी ऐकून शिवरायास मोठें आश्चर्य वाटलें. आम्हास विरुदें नकोत. व्यंकोजी उगीच पळाले अशा अर्थाचे त्यांनीं उद्गार काढले.

मध्यंतरी वेरूळचा किल्ला नरहरी बल्लाळ नावाच्या गृहस्थानें पुष्कळ दिवस वेढा घालून घेतला. रघुनाथ नारायण यास चंदीचा कारभार पाहण्यास ठेवलें. तसेंच लष्करी लोक रक्षणार्थ असावें ह्मणून हबीरराव सेनापती यांसही ठेविलें. ही बातमी ऐकून व्यंकोजी राजे त्यांवर चालून आले. पण पराभव पावले. सारांश कर्नाटकाच्या स्वारींत महाराज सर्व प्रकारें यशस्वी होऊन आपल्या राज्यात परत आले. नंतर थोडक्याच दिवसांनीं रायगडास महाराजास गुडघी नावाचा रोग होऊन रौद्रनाम संवत्सरी शके १६०२ चैत्र शु० १५ रविवारीं ते हा लोक सोडून गेले.

झालें. महाराजाचें चरित्र येथें संपलें. आता त्याच्या चरित्रापासून काय बोध घ्यावयाचा, त्यास इतिहासात कोणतें स्थळ द्यावयाचें, वगैरे गोष्टींचा उल्लेख पुढील उपसंहारात करून वाचकाची रजा घेऊ.

शिवाजी महाराजाच्या चरित्रावरून ते कोणत्या प्र-

कारचे सत्पुरुष होते हे वाचकास दिसून येईल. जगाच्या इतिहासात आजपर्यंत जे थोर पुरुष होऊन गेले त्याच्यापैकीं शिवाजी महाराजाची गणना कोणत्या कोटींत करावी हा प्रश्न उत्पन्न होतो. स्वधर्मस्थापनकर्ते ह्मणून त्यास शंकराचार्यांच्या पदवीस न्यावें, अगर स्वराज्यस्थापनकर्ते म्हणून आजवर जगाच्या पाठीवर जे महान पराक्रमी पुरुष होऊन गेले त्यांच्या पक्तीस महाराजास नेऊन बसवावें, याचें कित्येकास मोठें गूढ पडेल. आचार्यांची योग्यता निराळी. त्यांनीं हिंदुधर्माची स्थापना केली. महाराजानीं त्या धर्माचें स्वपराक्रमानें रक्षण केलें. आचार्य मोठे विद्वान होते. श्री छत्रपति शिवाजी तसे नव्हते. म्हणून "आचार्य आणि आबासाहेब"* हा तुलनेचा विषयच होत नाहीं. श्री सद्गुरु रामदासस्वामी आणि आचार्य यांच्यात तशी तुलना करूं म्हटल्यास काहीं शोभेल. ह्यावरून शिवरायाची ज्यांच्याशीं तुलना करावयाची त्यांनीं स्वपराक्रमानें, तरवारीच्या बळानें जगात आपलें नांव कायम करून ठेविलें आहे अशाच लोकाशी केली पाहिजे. असे पुरुष म्हणजे अलेक्झांडर, नेपोलियन बोनापार्ट वगैरे मंडळी होत. सध्या आपण वर सांगितलेल्या दोन थोर पुरुषाशीं श्री छत्रपतींचे कितपत साम्य आहे हें पाहूं.

म्यासिडोनिया देशाचा राजा अॅलेक्झांडर धि ग्रेट

---

* शिवाजी महाराजाचें हें टोपण नाव होतें

अथवा शिकंदर हा मोठा योद्धा होता, अतिशय महत्वाकांक्षी होता. त्याचा बाप फिलीप याच्या मनांत ग्रीक लोकांस जिंकावयाचें होतें पण तें काम शेवटीं अलेक्झांडरचे हातून तडीस गेलें. अलेक्झांडरनें ग्रीसचें राष्ट्र पालथें घातलें नाहीं तर आशियाखंडात हिंदुस्थानात येऊन पुढें चीन देशातही जाण्याचा त्याचा विचार होता. ही गोष्ट सर्वांस माहीत आहे. श्री शिवाजी महाराजापेक्षां अलेक्झांडर पराक्रमानें कांकणभर अधिक होता असेंही म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. परंतु मनुष्याची योग्यता त्याच्या एका गुणावरच समजावयाची नसून त्याचें खासगी वर्तन, त्याची एकंदर परिस्थिती, हीं हीं लक्षात आणिलीं पाहिजेत. तशा रीतीनें विचार करूं लागलें म्हणजे शिवाजी महाराजाच्या सद्गुणाचें पारडें शिकंदराच्या सद्गुणाच्या पारड्यापेक्षा खात्रीनें जड आहे असें आम्ही म्हणतों.

प्रथम दोघाच्या परिस्थितीचा विचार करूं. एकास दादोजी कोंडदेव, रामदास स्वामी, अशा थोर पुरुषाचा उपदेश, तर दुसऱ्यास अरिस्टाटलचें महत्वाकांक्षेनें परिपूर्ण भरलेलें शिक्षण, एकास जिजाईकडून जसे उत्तम गृहशिक्षण मिळून भारत रामायणांतील वीरपुरुषांचीं पवित्र चरित्रें ऐकण्याची उत्तम संवय, तशीच दुसऱ्यासही तू ट्रायच्या वेढ्यातील रणशूर ॲकिलीज ह्याचा वंशज आहेस असें अलिंपिअसचें लहानपणापासून सांगणें

होतें. एक इतिहासकार म्हणतो कीं अलेक्झांडरची आई स्वत च मोठी महत्वाकांक्षी बायको असून तिच्यात देवभोळेपणाही पुष्कळ होता. अलेक्झांडरचे अंगात जातीचेंच पाणी होतें त्यामुळें तिच्या शिक्षणाचा परिणाम त्यावर फारच झाला. परंतु त्याच्यापेक्षा अगदीं लेच्या-पेच्या मनुष्य आलिपिअसच्या शिक्षेत असता तर त्याच्या-ही मनात उत्साह भरून त्याचे बाहु स्फुरण पावले असते. ती अलेक्झांडरास फिलिपियस ( अकिलीज ) म्हणत असे आणि आपणा स्वत स अकिलीजचा गुरु फिनिक्स म्हणवीत असे. इतक्या गोष्टींत शिकंदराचे आणि शिवाजी महाराजाचें बरेंच साम्य आहे. परंतु दोघात अंतरही पुष्कळ होतें. शिकदर शूर तर खराच परतु त्यास लागणारी सर्व तयारी त्याचा बाप फिलिप यानें करून ठेविली होती. ग्रीस देशास पूर्ण जिकण्याचें यश घेण्याचें फिलिपच्या नशिबीं नव्हतें. फिलिप असतांनाच शिकदर त्याबरोबर सेनापतीचें काम करू लागला होता. शिवाजीनें एकोणिसाव्या वर्षी तोरणा किल्ला घेतला, ही जशी प्रशसनीय गोष्ट आहे त्याचप्रमाणें अलेक्झाडर हा ही आपल्या वयाच्या अठराव्या वर्षी केरोनियाच्या समरांगणांत उभा राहिला हें भूषणास्पद होय. दोघांतील अंतर म्हणून आम्हास सांगायचें तें हें कीं शिकंदरास लहानपणापासून अनुकूल परिस्थिति होती त्यामुळें त्याच्या महत्वाकांक्षेस अधिक जोर आला. शिवाजी

महाराजास कशाची बरें मदत होती ? त्याना पहिल्यापासूनच आपल्या स्वतःच्या पायावर उभे राहण्याची तयारी करावी लागली. बापानें एकादें दुसरें गाव जहागिरीचें मिळवून ठेविलें ह्मणून त्यावर केवढी इमारत रचतां येणार ? परंतु सर्व अडचणी दूर करून अगदीं अशिक्षित परंतु पूर्ण विश्वासु मावळ्यास आपलेंसे करण्यास त्यास काय श्रम पडले असतील? स्वधर्माची ज्योत त्यांच्या अंतःकरणात पेटविण्यास त्यास काय काय करावें लागलें असेल? आणि ही सर्व तयारी एकोणीस वर्षांचें आत होऊन शिवाजीस १६४७ सालीं तोरणा किल्ला घेतां येतो, ही काय थोड्या आश्चर्याची गोष्ट आहे? सारांश शिवाजीस ज्या गोष्टी प्रतिकूळ होत्या निदान ज्या मिळविण्यासाठीं अतोनात श्रम करावे लागले त्या गोष्टी फिलीपनें शिकंदरासाठीं अयत्याच तयार करून ठेविल्या होत्या, हें निर्विवाद आहे. आतां शिवाजी महाराजांच्या आणि शिकंदराच्या खाजगी वर्तनातील अंतर पाहूं.

शिवाजीच्या अंगचा पहिला मोठा गुण पूर्ण इंद्रियनिग्रह हा होय. कल्याण घेतल्यावर आबाजी सोनदेवानें एक खुपसुरत यवन कन्या आणून शिवाजीस नजर केली, आणि शिवाजीनें तीस आपल्या मातुश्रीची उपमा देऊन परत केलें, ह्या एका उदाहरणावरून हें सहज कळण्याजोगें आहे. त्यांत विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, शिवाजी अगदीं तरुण असतांना कित्येक मी मी

म्हणणाऱ्या ऋषीवर्यांच्या हातून जी गोष्ट व्हावयाची नाही ती त्यानें केली. शिवाजीमहाराज पितृभक्त होते. शहाजीराजास विजापूरकरानीं कैद केलें. ही गोष्ट समजतांच महाराजानीं मुसलमानापुढें मान लवावयाची नाहीं हा विचार क्षणभर बाजूस ठेऊन दिल्लीपतीशीं सलोखा केला, आणि आपल्या परमपूज्य वडिलांची बंदीवासांतून सुटका केली, इतकेंच नव्हे " तर तूं माझा मुलगा असशील तर बाजीघोरपड्याचा सूड घेशील " हा वडिलांचा निरोप ध्यानांत ठेऊन, ज्या नीचानें विश्वासघातानें शहाजीराजास विजापूरच्या दरबारात कैद करून आणिलें, त्याचा योग्य संधीपाहून महाराजांनीं पक्का सूड उगविला शहाजीराजाविषयीं वसत असलेलें प्रेम कोणीकडे, आणि आपल्या बापानें दुसरें लग्न केलें, कदाचित पुढें त्यापासून होणाऱ्या संततीच्या योगानें आपल्या राजपदास धक्का पोंचेल, अशा भीतीनें प्रत्यक्ष बापाचा खून करणाऱ्या अगर करविणाऱ्या शिकंदराचें पितृप्रेम कोणीकडे ! शिकंदराची भयंकर राज्यतृष्णा येथेंच थांबली नाहीं:— त्यानें क्लिओपाट्रापासून झालेल्या आपल्या तान्ह्या सावत्रभावास ठार मारिलें, क्लिओपाट्राचा चुलता अटालस ह्यासही जगांतून नाहींसें केलें.

जगाचें राज्य मिळविल्यामुळें शिकंदरास स्वर्ग दोन बोटें उरला होता. शिवाजीमहाराजांस आपल्या पराक्रमाचा आपल्या कर्तृत्वाचा गर्व होऊन त्यांच्या हातून एखादें निंद्यकृत्य झाल्याचें आमच्या ऐकण्यांत नाहीं. परंतु

७

अलेक्झांडराची गोष्ट निराळी. अलेक्झांडराचा प्रख्यात सेनापति पारमेनियो ह्याचा मुलगा फायलोटस हाही सेनानी मंडळापैकींच एक होता. तो फार स्पष्टवक्ता होता. त्यानें शिकंदराचें गर्वाचें वर्तन पाहून माझ्या बापाच्या मदतीवांचून आपणास एशिया खचित जिंकता आला नसता, असें स्पष्टपणें सांगितलें. ह्या महापातकाबद्दल अलेक्झांडरानें त्याच्यावर आणि त्याच्या बापावर, प्रत्यक्ष माझा खून करण्याच्या कटांत तुम्हीं सामील होता, असा आरोप ठेविला. पारमेनियो तेथें नव्हता. फायलोटस ह्याचा छल करून त्याच्याकडून कबूल जबाब घेतला. आणि त्याचें डोकें उडविलें. पारमेनियो हा एकबटना येथें होता, त्यास एका जासुदाच्या हातीं पत्र दिलें. तें तो वाचीत असतां जासूदानें त्याच्या पाठींत भोंसकून मारलें.

आपल्यास राज्य मिळविण्यास ज्यांनीं कायावाचामनें करून हात भार लाविला त्याच्या सेवेचें उत्तम फळ शिकंदराच्या हातून अशा प्रकारें मिळत असे ! निदान त्या गोष्टीच्या पुराव्यास आपल्याजवळ वरील एक उदाहरण तरी आहे. शिवाजी महाराजांचें आपल्या हाताखालील मंडळीवर पूर्ण प्रेम असे. कोण कशी चाकरी बजावतो हें त्याच्या पक्कें ध्यानांत होतें, आणि त्याप्रमाणें त्याची वाहवा करण्यास आणि त्यास बढती देण्यास, ते कधींही चुकले नाहींत.

शिवाजी महाराज व्यसनापासून अगदीं अलिप्त होते.

अलेक्झांडरचें वर्तन ह्याच्या उलट होतें. तो दारूचा पूर्ण भक्त होता. ह्या व्यसनाच्या योगानें त्याच्याहातून एकदोन भयंकर प्रमाद झाले, व त्याबद्दल त्यास पश्चाताप ही झाला. एकदिवस शिकंदर दारू पिऊन धुंद झाला असता कांहीं स्तुतिपाठक त्याचें स्तुतिस्तोत्र गाऊ लागले. परंतु 'क्लीटस' ह्मणून एक सेनानायक होता. त्यास हें आवडलें नाहीं, आणि पार्मेनियो आणि फायलोटस या पितापुत्रांस आपण केवळ अन्यायानें मारिलें, असें त्यानें बादशहास स्पष्ट सांगितलें. अलेक्झांडरास तें सहन न होऊन दोघाचें भांडण जुंपलें आणि त्यांत क्लीटसचा अंत झाला.

वर सांगितलेल्या दोनचार उदाहरणावरून शिवाजी महाराज आणि शिकंदर ह्याच्या खाजगी वर्तनांतील अंतर वाचकास सहज दिसून येईल. शिकंदराच्या अंगीं गुणही पुष्कळ होते. तो विद्वान होता. अरिस्टॉटलचें त्याला शिक्षण मिळालें होतें वगैरे पहिल्या प्रथम सांगितलेंच आहे. ह्या त्याच्या गुणावरून, शिवाय राज्यें काबीज करणारा, उत्तम योद्धा, इत्यादि इतर गुणावरून, इतिहासांत त्याचें नाव बऱ्याच पायरीस चढलें आहे. शिकंदरांत जे गुण होते ते शिवाजी महाराजांत असून त्याच्या सगळ्या दुर्गुणाचा महाराजांत अभाव होता. ह्यावरून शिवाजी महाराजाची योग्यता अलेक्झांडरपेक्षां खचित खचित अधिक होती, असें कोणीही समजस मनुष्य कबूल करील. ह्या दोघा थोर पुरुषांत आण-

षी एक भेद होता तो हा कीं शिकंदरास केवळ राज्य तृष्णेनें पछाडलें होतें, आणि शेवटी आता कांहीं जिंका वयास उरलें नाहीं म्हणून तो रडला असेंही म्हणतात. शिवाजीमहाराजाचें तसें नव्हतें. त्यांनीं राज्य मिळविलें तें केवळ स्वधर्मरक्षणासाठीं, हें त्याच्या चरित्रात सांगितलेंच आहे. त्यांना अनिवार राज्यतृष्णा मुळींच नव्हती. उलट इतकें मिळविलेलें राज्य गुरुदक्षणा म्हणून मी आपणास हें अर्पण करितों, अशी चिट्ठी लिहून त्यानीं ती श्री रामदासस्वामीच्या झोळींत घातली, हें चरित्राच्या आरंभीं दिलेल्या चित्रावरून दिसून येईल.

नेपोलियन बोनापार्टाशी महाराजाची तुलना करून पाहता असेंच कांहीं अंतर दिसून येतें. नेपोलियन हा अतिशूर शिपाई होता. फ्रान्स देशात राज्यक्रांति घडवून आणून आपल्या पराक्रमाने आणि सुस्वभावानें पहिल्या प्रथम तो अतिशय लोकप्रिय झाला. परंतु पुढें त्याच्या हातून कांहीं चुका झाल्या, त्याचें प्रायश्चित त्यास भोगावें लागलें. लोकानीं त्याला बादशहा केलें. येथेंच त्याची महत्वाकांक्षा थांबली असती, तर बरें झालें असतें. परंतु तसें न होतां एकाबाजूनें युरोपातील राष्ट्रें काबीज करण्याची प्रबळ इच्छा अनिवार झाली. दुसऱ्याबाजूनें ऑष्ट्याच नातलगांस जिंकलेल्या राष्ट्राचे राजे करण्यात त्यानें मोठी चूक केली. शिवाजीमहाराजानीं केवळ स्वार्थासाठीं असें कांहीं केलें नाहीं. राज्यांत सर्व प्रकारचे लो-

कांस सारखें वागविलें. राज्य वाढविण्याची त्यांची इ-च्छा मर्यादेबाहेर कधींही गेली नाहीं.

शिवाजी महाराज ईश्वराचे अवतार होते, असा जो समज आहे, त्याबद्दल थोडेसें लिहून हा उपसंहार पुरा करूं. ईश्वरीकृपा ही एक अमूल्य देणगी शिवाजीस असेल, परंतु पुरुषार्थाची कामें करण्याची हौस, व्यासंगपरायणता, स्वधर्मरक्षणबुद्धी, आणि तदर्थ करावे लागणारे श्रम, सोसावे लागणारे हाल, वगैरे गोष्टी मानवी स्वभावास अनुसरून आहेत. ईश्वरी कृपा, सद्गुरूचें शिक्षण, हीं तर पाहिजेतच; परंतु शिवाजी म्हणजे परमेश्वराचा अवतार होता ही कल्पना आमच्या मतें बरोबर नाहीं. शिवाजी ईश्वराचा अंश होता म्हणूनच केवळ आम्हीं त्याच्या पायीं लीन होत नाहीं. नरजन्मांत येऊन ईश्वराच्या उच्चतम गुणांचें अनुकरण करून त्याच्या जवळ जवळ आपली योग्यता मनुष्यास नेता येते. आणि अशी जी कांहीं माणसें झालीं त्यापैकींच आमचे महाराज हे एक होत. अशीं माणसें सर्व देशास सर्व कालीं पूज्य होतात. निःपक्षपातानें आणि शांतपणानें विचार करूं लागल्यास कोणत्याही राष्ट्रांतील—मग तें राष्ट्र मित्र असो अगर शत्रू असो—लोक त्या पुरुषास धन्य मानतात. यावर त्यास तुम्ही ईश्वरी अवतार असें निराळें नाव पाहिजे तर द्या; परंतु असें करण्यांत मनुष्याच्या हातून पुरुषार्थ असा कांहींच व्हावयाचा नाहीं. ह्यासाठीं

शिवाजी अगर शिवाजीसारखे इतर महात्मे हास ते ईश्वरी अवतार होते, ही कल्पना घेऊन चाळण्यापेक्षा त्यांनीं आपल्या पराक्रमानें, आपल्या आचारबुद्धिसामर्थ्यानें, अति पवित्र ईश्वरभक्तीनें, निर्मळ वर्तनानें, आपल्या स्वत स ईश्वरस्वरूप केलें, ही कल्पना अविके चांगली असें ह्या अल्पबुद्धि लेखकाचें मत आहे. अशी कल्पना केल्यावर मग तुह्मीं त्या पुरुषाचे हवे हवें तसे देव्हारे माजवा, त्याचे उत्सव करा, त्याच्या जयंत्या करा. शिवाजी देव होता असे अगोदरच गृहीत धरणें ह्मणजे त्यानीं केलेलीं कृत्यें करण्यास आपण असमर्थ आहों असा पुरावा आणणें होय असा पुरावा आणूं नका. शिवाजीच्या हातून जी देशसेवा झाली, जीं सत्कार्यें झालीं, तशा प्रकारची देशसेवा हरएक देशच्या प्रत्येक मनुष्यास कर्तव्य आहे; ह्मणजे शिवाजीनें स्वधर्मरक्षण केलें. स्वधर्म रक्षणाचें काम प्रत्येक मानवी प्राण्याचें आहे. स्वधर्मरक्षण हें जसें शिवाजीस तसेंच सर्व लोकांसही साधावयाचें असतें. परंतु धर्म बुडण्याचीं कारणें निरनिराळी असल्यामुळें साधनेंही निराळीं असतात. जेथें लोक स्वत.च नास्तिक झाले, तेथें तरवारीचा उपयोग नाहीं. शिक्षणाचा प्रसार हेंच असल्या काळीं धर्मरक्षणाचें उत्तम साधन होय. लोकांचीं मनें सुशिक्षित करून तीं स्वधर्माकडे लावणारा एखादा महात्मा हिंदुस्थानांत होईल तो सुदिन !

# शिवरायाची परार्थबुद्धि आणि समर्थांचा स्वार्थत्याग.

कोणे एके दिवशीं महाराज साताऱ्याचे किल्ल्यावर असतां श्री समर्थ रामदासस्वामी भिक्षा मागत मागत राजवाड्यांत आले. स्वामींनीं भिक्षा मागतांच महाराजांनीं बाळाजी आवजी चिटणीस याच्या हातून चिठ्ठी लिहून तीवर आपला शिक्का करून ती समर्थांच्या झोळींत घातली. 'आजपर्यंत जें राज्य मिळविलें ते स्वामी भिक्षेस अर्पण होवो' असा चिठ्ठींतील मजकूर होता. ह्या भिक्षा-दान-ग्रहणाच्या प्रसंगाची तसबीर पुस्तकाच्या आरंभीं जोडली आहे, त्यावरून त्या प्रसंगाची वाचकास बरोबर कल्पना करितां येईल. रामदास स्वामींनीं रायास थोडासा उपदेश करून ती चिठ्ठी परत केली; आणि शिवाजीच्या आग्रहावरून दोन गोष्टी करण्याची आज्ञा केली. शिवाजी महाराजाच्या वेळेपर्यंत दोघे मराठे भेटल्यास परस्परास 'जोहार' करीत असत. ही मुसलमान पद्धती सोडून देऊन परस्परास भेटीच्या प्रसंगीं 'राम राम' करण्याविषयीं समर्थांची पहिली आज्ञा होती. समर्थांस महाराजांनीं राज्यार्पण केल्याचें सुचविण्यासाठीं स्वामींची दुसरी आज्ञा अशी होती कीं मराठ्यांच्या निशाणाचा रंग समर्थांच्या पेहेरावास साजेल असा भगवा असावा. समर्थांच्या आज्ञेनुरूप मराठ्यांच्या भगव्या झेंड्यानें आर्यावर्तांत केलेले पराक्रम वाचकास नि-

दितच आहेत. ह्या एका प्रसंगावरून शिवाजी महाराजांची निरपेक्षबुद्धि व समर्थांच्या चरणीं असणारी निष्ठा, तसाच समर्थांचा स्वार्थत्याग, ही व्यक्त होतात. श्री शिवाजी महाराजांच्या हातून जे पराक्रम झाले त्यास मुख्य कारण समर्थांकडून वेळोवेळीं महाराजास मिळत गेलेलें उपदेशामृत होय. महाराजांच्या आगीं जी शक्ति होती ती शक्ति पुष्कळांच्या आगीं असू शकेल. परंतु देशाची व धर्माची स्थिति पाहून त्याच्या अंगाचा जसा दाह होत असे, त्याच्या ठिकाणीं जसे अनेक गुण वसत असत, त्यांना सहाय्य करण्यास त्याच्याजवळ जसे एकनिष्ठ सेवक असत, व अखेरीस त्यांना संकटसमयीं धीर देण्यास जसे समर्थांसारखे गुरु असत, तशी अनुकूल स्थिति फारच थोड्यांची असू शकेल. समर्थांनी महाराजास वेळोवेळीं जे उपदेश केले आहेत ते सर्व ह्या अल्प पुस्तकांत देणें शक्य नव्हे, ह्मणून उपदेशापैकीं त्रोटक उतारे वाचकासाठीं खालीं देऊन हा भाग पुरा करूं.

शके १५७१ त समर्थांकडून महाराजास जें पत्र आलें होतें त्यांत खालील प्रमाणें प्रोत्साहन देऊन,—

तीर्थ क्षेत्रें मोडिलीं । ब्राम्हणस्थानें भ्रष्ट झालीं
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला
देव धर्म गो ब्राम्हण । करावया संरक्षण
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हांकारितां

पुढीलप्रमाणें कर्तव्याची दिशा सुचविली:—

मारिता मारिता मरावें । तेणें गतीस पावावें
फिरोन येता भोगावे । महद्भाग्य
नजरकरार राखणें । कार्य पाहून खतल करणे
तेणें रणशूराचीं अंत:करणें । चकित होती
ऐसे अवघेच उठतां । परदळाची कोण चिंता
हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा
देव मात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें
मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा
येविषयीं न करिता तकवा । पूर्वज हासति
मरणहाक तो चुकेना । देह वाचविता वांचेना
विवेकी होउनि समजाना । काय करावें
भले कुळवंत म्हणावें । तेहीं वेगीं हजीर व्हावें
हजीर न होता कष्टावे । लागेल पुढें
देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते
देवदास पावती फत्ते । यदर्थीं संशय नाहीं

---

## शिवस्तोत्र.

(" सुंदर मुख तुंदिल तनु नंदिकेश्वरा " ही चाल )

शिवगायन गाऊं सप्रेम मानसें ।
सकल शोकमुक्तीचा हाच पथ दिसे । " ध्रु० "

आर्यावर्तात यवन जाहले बळी ।
देती यमधजमुखीं गोद्विजा बळी ।
हिंदुमंदिरें अनेक मिळविलीं धुळीं ।
मशिदी उभवून दिल्या मंदिरस्थलीं ।
आर्यधर्मनाशाची वेळ पातली ।
दग्धहृदय होतील न हिंदु मग कसे? ॥ १ ॥

( " सुस्वर सुरुचिर कवन नव सुनाटिका "— ही चाल )

आळविला दीनाचा नाथ त्या जनीं ।
भरतें त्या करुणेचें लोटलें मनीं ।
अंगें तो सिद्ध होय दीनरक्षणीं ।
अवतरला शिवरूपें देव या जनीं ।
रगावें मनुजें तत्कीर्तिगायनीं ।
नेणें देशाभिमान मानसीं ठसे ॥ २ ॥

( " महाराज आज आपुलि ही दीन किंकरी "— ही चाल )

शिवरायें समरीं यवनास मर्दिलें ।
धर्माच्या पायीं सर्वस्व वाहिलें ।
देशास्तव जीवितही तुच्छ लेखिलें ।
स्वजनांच्या विघ्नसंकटास वारिलें ।
धर्मातें—देशालें पूर्ण सुख दिलें ।
स्वार्जित राज्यपदीं भूप मग बसे ॥ ३ ॥

("धन्य जाहला तुम्ही हो, राम पाहिला"-- ही चाल)

घोर युद्ध झालें कल्याणसंगरीं ।
सापडली यवनाची कन्यका करीं ।
जीच्या रूपास नसे जोड भूवरी ।
न धरी अभिलाष तिचा भूप अंतरी ।
परनारी जननीसम गौरवी परी ।
भूलोकीं ऐसा जन कोणता असे? ॥ ४ ॥

---

समाप्त.